सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २४५ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### बिबट्याचे हल्ले ही आपत्कालीन बाब : शरद सोनवणे

**नागपूर :** माझ्या विभागात ५५ बिबट्यांमुळे बळी गेले. महाराष्ट्राचा बिबट हा आपत्कालीन घोषणा करावा. बिबट्याचे हल्ले ही आपत्कालीन बाब आहे, ग्रामीण भागात शेतामध्ये महिला भगिनी नागरिक सुरक्षित नाही. माणूस मेल्यावर २५ लाख दिले जाते, मात्र माणसाच्या मृत्यूची ही किंमत होऊ शकत नाही. अधिकारी एसीमध्ये बसतात त्यांना बिबट्याची भीती नाही असे आमदार शरद सोनवणे म्हणाले.

### पुणे विमानतळावर २.२९ कोटींचा गांजा जप्त

**पुणे :** पुणे विमानतळावरून २.२९ कोटी रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला आहे. प्रवाशाच्या बॅगमध्ये २ किलो गांजा साडपला. बँकॉकवरून परतणाऱ्या प्रवाशाकडे अंमली पदार्थ सापडले. पुण्याच्या एअर इंटेलिजन्स युनिटने ही कारवाई केली. एअर इंटेलिजन्स युनिटकडून एका प्रवाशाला अटक करण्यात आली.

### सांगली–जतमध्ये भानामतीचा प्रकार

**सांगली :** नगरपरिषद निवडणुकानंतर करणी भानामतीचे प्रकार विविध ठिकाणी उघडकीस येत आहेत. सांगलीच्या जतमध्ये करणीभानामतीचा प्रकार समोर आला आहे. त नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीतील उमेदवारांच्या बाबतीत ही करणी भानातमी केल्याचे उघड झाले. यामुळे शहरामध्ये एकच खळबळ उडाली आहे.

### व्हीआयपी, ऑनलाईन दर्शन बंद

**पंढरपूर :** नाताळच्या सुट्टीच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने भाविकांसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. २१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत श्री विठ्ठलाचे व्हीआयपी, ऑनलाईन आणि टोकन दर्शन पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय मंदिर समितीने घेतला आहे. सुट्टीच्या या कालावधीत जवळपास चार ते पाच लाख भाविक पंढरपूरमध्ये येण्याचा प्रशासनाचा अंदाज आहे. भाविकांना सुलभ आणि त्वरित दर्शन मिळावे यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली आहे.

### अवैध राजकीय होर्डिंग तातडीने हटवा

**नागपूर :** नागपूरमध्ये सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान शहरातील अवैध राजकीय होर्डिंग्ज त्वरित हटवण्याचे स्पष्ट आदेश हायकोर्टाने दिले आहेत. नेत्यांच्या मनमानी वागणुकीवर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नागपूर शहरात ठिकठिकाणी नेत्यांच्या स्वागताचे जे पोस्टर्स, बॅनर्स आणि फ्लेक्स लागले आहेत, ते तातडीने हटवण्याचे निर्देश महापालिकेला देण्यात आले आहेत. आता नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे.

### नागपुरात बिबट्याची दहशत

**नागपूर :** नागपुरातील पारडी शिवारात बिबट्याने धुमाकूळ घातला आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये मोठे भीतीचे वातावरण आहे. दोन दिवसांपूर्वी कापसी भागात दिसलेल्या याच बिबट्याने आज पहाटे दोन किंवा अधिक लोकांवर हल्ला केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर परिसरामध्ये पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे.

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान स्थळाच्या जागतिक दर्जाच्या विकासाला मंजुरी

**नागपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज नागपूर येथील विधानभवन स्थित मंत्री परिषद सभागृहात शिखर समितीची बैठक झाली. यामध्ये स्वराज्य रक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ (तुळापूर) आणि समाधी स्थळ (वढू बुद्रुक) यांच्या सुधारित विकास आराखड्यास अंतिम मंजुरी देण्यात आली.

राज्य सरकारने स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या हौतात्म्याचा आदर करत जागतिक दर्जाचे प्रेरणादायी स्मारक उभारण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा शौर्य, त्याग आणि पराक्रमाचा इतिहास सर्व जनतेपर्यंत व भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हा याचा याचा मुख्य उद्देश आहे.

नव्या सुधारित आराखड्यानुसार भीमा नदीवरील तुळापूर–आपटी येथे पूल बांधणे आणि आपटी–वढू (बु.) रस्त्याचे रुंदीकरण, स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या तुळापूर बलिदान स्थळी संग्रहालय, ८२ आसनी क्षमतेचा १० डी शो सभागृह, प्रशासकीय इमारत, ग्रंथालय, स्मरणिका दुकाने, प्रवेशद्वार, ३५० मीटर लांबीचा नदी घाट, वाहनतळ, शौचालय व उपहारगृह यांची कामे सुरू, समाधी स्थळ वढू बुद्रुक येथे संग्रहालय, प्रशासकीय इमारत, स्मरणिका दुकाने, प्रवेशद्वार, १२० मीटर लांबीचा नदी घाट, वाहनतळ, शौचालय व उपहारगृह, भीमा नदीवरील पुलावर १२ मीटर रुंदीची 'विविंग गॅलरी', तुळापूर वढू बुद्रुक येथे १०० फूट उंच हिंदवी स्वराज्य ध्वज उभारण्याची योजना आदी कामांचा समावेश आहे. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार ज्ञानेश्वर कटके, मुख्य सचिव आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.



**नागपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे पुणे जिल्ह्यातील 'बलिदान स्थळ' मौजे तुळापूर, ता. हवेली व 'समाधी स्थळ' मौजे वढू (बु)., ता. शिरूरच्या विकास आराखड्याबाबत 'शिखर समिती'ची बैठक संपन्न झाली. यावेळी यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## ओबीसी समाजासाठी मिनी महामंडळ : मुख्यमंत्री

**नागपूर :** विधान परिषदेमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी समाजाच्या कल्याणासाठी एक महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. ओबीसी समाजासाठी स्थापन करण्यात आलेल्या महामंडळांच्या अंतर्गत आता 'मिनी महामंडळे' स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, ओबीसी समाज हा सुमारे ३५० घटकांचा मिळून एक व्यापक समाज आहे आणि या समाजातील काही घटक आजही वंचित राहिले आहेत. या घटकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी मिनी महामंडळे उपयुक्त ठरतील. या मिनी महामंडळांवर शासकीय अधिकारी तसेच ओबीसी समाजातील अनुभवी नेते यांची नियुक्ती केली जाईल. यामुळे प्रशासकीय कार्यक्षमतेसह



सामाजिक प्रतिनिधीत्व देखील सुनिश्चित होईल.

सध्याच्या योजना सगळ्यांसाठी सारख्या असल्या तरी, प्रत्येक घटकाच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना योजनेचा लाभ मिळावा यासाठी हे प्रयत्न आहेत. मुख्यमंत्री म्हणाले की, पहिल्या टप्प्यात महामंडळे कार्यान्वित करायची होती आणि आता मिनी महामंडळांद्वारे योजनेची व्याप्ती वाढवली जाईल. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या यशस्वीतेचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, या महामंडळाच्या बाबतीत नवीन धोरण राबविण्यात आले, ज्यामुळे त्याची प्रभावीता वाढली. अण्णासाहेब पाटील महामंडळामार्फत आतापर्यंत २९ हजार लोकांना कर्ज वितरित करण्यात आले आहे. ही संख्या समाजातील लोकांपर्यंत योजना पोहोचल्याचे दर्शवते.

### सीईटी नोंदणीसाठी अपार आयडी बंधनकारक

**मुंबई :** पुढील शैक्षणिक वर्षाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सीईटीसाठी डिसेंबर अखेरपासूनच नोंदणी सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांची अचूक माहिती उपलब्ध व्हावी, तसेच त्यांची पडताळणी करणे सहज शक्य व्हावे यासाठी सीईटी नोंदणीसाठी 'अपार आयडी' चा निर्णय घेतला आहे.




## सह्याद्री रुग्णालयात तोडफोड

### शस्त्रक्रियेवेळी रुग्ण दगावला; संतप्त नातेवाईकांचा ठिय्या

**पुणे :** पुण्यातील सह्याद्री रुग्णालयात एका व्यक्तीचा शस्त्रक्रियेदरम्यान मृत्यू झाल्यामुळे संतापलेल्या नातेवाईकांनी शुक्रवारी रुग्णालयाची तोडफोड केली.

हडपसर येथे असलेल्या सह्याद्री रुग्णालयात गेल्या काही दिवसांपासून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे पदाधिकारी




असलेल्या अजय सपकाळ यांच्या वडिलांवर उपचार सुरु होते. मात्र, बुधवारी रुग्णालयातील शस्त्रक्रियेदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. यानंतर सपकाळ यांच्या संतापलेल्या नातेवाईकांनी सह्याद्री रुग्णालयात तोडफोड केली. यावेळी रुग्णालयाच्या इमारतीच्या दर्शनी भागातील काचा कचऱ्याचा स्टीलचा डबा आणि लोखंडी वस्तूंच्या साहाय्याने फोडण्यात आल्या. त्यामुळे रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळ काचांचा खच पडला होता. यानंतर मृत रुग्णाच्या नातेवाईकांनी सह्याद्री हॉस्पिटलबाहेर ठिय्या आंदोलन सुरु केले.

या सगळ्याबाबत शिंदे गटाचे पदाधिकारी अजय सपकाळ यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यांनी म्हटले की, मी शिंदे गटाचा वैद्यकीय कक्षाचा शहर प्रमुख आहे. माझ्याबाबत ही गोष्ट असेल तर सामान्य लोकांची काय अवस्था असेल. माझ्या वडिलांचं सह्याद्री रुग्णालयात अल्सरचं ऑपरेशन होणार होतं. ही फक्त दोन टाक्यांची साधी शस्त्रक्रिया होती. मात्र, सह्याद्री रुग्णालयाने हळूहळू माझ्या वडिलांना डॅमेज केलं. हे हॉस्पिटल बकवास आहे, थर्डक्लास आहे. सह्याद्री रुग्णालयावर कारवाई झालीच पाहिजे, ही आमची मागणी आहे.

### टोलमाफी होणार!

**नागपूर :** राज्यातील ईव्ही व ई–बाइक वापरकर्त्यांना टोलमाफी देण्याबाबत आठ दिवसांत कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश देत आज पर्यंतच्या काळात टोल घेतला गेला असल्यास पुरावा सादर केल्यावर नागरिकांना टोल परतावा द्यावा, असे आदेश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले.




## बारामतीमध्ये ईडीची छापेमारी

**बारामती :** बारामतीमध्ये आज सकाळपासून ईडीची छापेमारी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. आनंद सतीश लोखंडे आणि विद्या सतीश लोखंडे यांच्या घरावर ईडीची धाडी पडल्याची माहिती आहे. जळोची या लोखंडेंच्या मूळ गावात ईडीची छापेमारी सुरू आहे. पुणे, मुंबईच्या दूध डेअरीवाल्यांना १० कोटींना गंडवल्याच्या प्रकरणात ईडीने छापेमारी केली आहे. मंत्रालयातल्या काही कर्मचाऱ्यांनाही गंडवल्याचा आरोप करण्यात आला आहे.




बारामती डेअरी प्रायव्हेड लिमीटेडच्या तक्रारीनंतरआनंद सतीश लोखंडे आणि विद्या सतीश लोखंडे यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. आनंद लोखंडे आणि विद्या लोखंडे यांनी बारामती तालुक्यात अनेकांना गंडवलं असल्याची माहिती आहे. मुंबईच्या कंपनीकडून २ कोटींचे बटर, ९३ लाखांचे दूध खरेदी करून हप्ते बुडवले असल्याचंही समोर आलं आहे. पुणे आणि मुंबईतील अनेक व्यावसायिकांना दुध व्यवसायात गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवून १० कोटी रुपयांहून अधिक रुपयांना गंडा घालण्यात आला आहे. या घोटाळ्यात अनेक वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांचाही सहभाग असल्याचे वृत्त आहे. या प्रकरणाच्या चौकशीचा भाग म्हणून ईडीने आज बारामतीमध्ये छापे टाकले आहेत.

बारामती डेअरी प्रायव्हेट लिमिटेडने जळोची येथील रहिवासी आनंद सतीश लोखंडे (२८) आणि विद्या सतीश लोखंडे (२४) यांच्याविरुद्ध १०,२१,५९,३६७ रुपयांच्या फसवणुकीची तक्रार दाखल केली आहे. लोखंडे दाम्पत्यावर पुणे आणि मुंबईतील इतर लोकांनाही अशाच प्रकारे फसवल्याचा आरोप आहे. या जोडप्याने तरुण उद्योजक असल्याचे भासवून एका प्रभावशाली राजकीय नेत्याचे समर्थक असल्याचा दावा केला. बारामती तहसीलमध्ये विविध क्षेत्रात अनेक कंपन्या उघडल्याचा आणि लोकांकडून मोठ्या प्रमाणात पैसे उकळल्याचा आरोप आहे.



लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ऊस तोडणी कामगारांसाठी मोफत आरोग्य शिबीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** निवळी येथील विलास सहकारी साखर कारखान्याच्या चालू गळीत हंगामातील ऊस तोडणी व वाहतूक यंत्रणेतील कामगार, मजूर, चालक यांच्यासाठी नुकतेच मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. त्याचप्रमाणे ऊस तोडणीसाठी आलेल्या बैलगाडीतील पशुधनाची तपासणीहीयावेळी करण्यात आली.

कारखान्याच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या आरोग्य शिबिरात एकूण २१५ मजुरांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले. य शिबिराच्या यशस्वीतेसाठी कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण पलंगे, डॉ. बालाजी बिराजदार, डॉ. रचना शिंदे, डॉ. नंदकिशोर निकते, एस.बी. मोरे, व्ही.एस. कुलकर्णी, किश पुंड, राजू लोमटे, सोनाली बिराजदार, शकील तांबोळी, विशाल सूर्यवंशी, ऐश्वर्या टिळक यांनी प्रयत्न केले. पशुधन तपासणी व उपचार शिबिरामध्येहीपशूंवर उपचार करण्यात आले. पशुधनाच्या तपासणीसाठी पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. साळवे, पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत शिंदे, पशुधन विकासाधिकारीडॉ. चव्हाण, डॉ. वाघमारे, डॉ. बोरोळे व त्यांची टीम सहभागी झाली होती.



# जिल्हास्तरीय साहित्य संमेलन अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालय, शिरूर अनंतपाळ यांच्या पुढाकारातून आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून होत असलेल्या जिल्हा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांची एकमताने निवड करण्यात आली.

महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदानातून प्रत्येक जिल्ह्याला एक मराठी साहित्य संमेलन या वर्षीपासून होत आहे. लातूर जिल्ह्यात शिरूर अनंतपाळ येथे दि. २७ व २८ डिसेंबर २०२५ रोजी हे संमेलन होत असून या संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडीचे पत्र श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालयाचे अध्यक्ष श्री एल.बी.आवाळे यांनी दिले.

ज्येष्ठ विचारवंत, शिक्षण तज्ज्ञ आणि विचारशलाकाचे संपादक म्हणून प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांचा लौकिक आहे. डॉ. कुंभार यांनी लातूर येथे १९८७ ला विचारशलाका त्रैमासिक स्थापना केली. सामाजिक आणि राष्ट्रीय समस्यांची सैद्धांतिक उकल करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता व वैज्ञानिक दृष्टीचा समाज निर्माण करण्यासाठी विचारशलाका त्रैमासिक प्रयत्नशील आहे. समाजातील दलित, वंचित, शोषित, आदिवासी व विमुक्त वर्गांच्या हक्कासाठी ते प्रयत्नशील असतात. मराठवाड्यातील सामाजिक विचारांची चळवळ अधिक विस्तारित



करण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. मराठी वैचारिक, परिवर्तनशील व प्रबोधन वाङ्मयात मौलिक योगदान डॉ. कुंभार यांचे आहे. मराठी वैचारिक साहित्याला त्यांचे मौलिक योगदान आहे.

'न्याय संकल्पना' हा विचारशलाकाचा पहिला अंक होता. चाळीस वर्षांपासून विचारशलाकाचे संपादक म्हणून डॉ. कुंभार यांनी सामाजिक प्रबोधन कार्यात स्वतःला वाहून घेतले आहे. घटनात्मक मूल्याधिष्ठित समाज निर्मितीसाठी सतत कार्यरत आहेत. धर्मनिरपेक्षता विशेषांक, लोकशाही, समता, ग्रामीण विकास, मंडल आयोग, तत्त्वज्ञान, उदारमतवादी, सामाजिक चळवळी, विचारवंत व समाज, भारतीय समाजासमोर आव्हाने, प्रबोधन विशेषांक, भारतीय राज्यघटना, दहशतवाद विशेषांक, संत साहित्य विशेषांक, गुलामगिरी आणि विचार अभिव्यक्ती विशेषांक, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी विशेषांक, बौद्ध तत्त्वज्ञान विशेषांक तर महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेला वाहून घेणाऱ्या सामाजिक विचारवंतावर विचारशलाकाचे अत्यंत महत्त्वपूर्ण विशेषांक त्यांनी प्रकाशित केलेले आहेत.

यामध्ये गं. बा. सरदार, पंडित जवाहरलाल नेहरू, म. ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे, आचार्य शं. द. जावडेकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी, यशवंतराव चव्हाण, जे. कृष्णमूर्ती विशेषांक, अमर्त सेन, धनंजयराव गाडगीळ, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ना.य. डोळे, प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी, ग.प्र. प्रधान गौरवांक, वसंतराव काळे, रा.ना. चव्हाण यांच्या कार्यावर विशेषांक प्रकाशित आहेत. अनेक विशेषांकातून प्रबोधनाची पायवाट अधिक विस्तारित केलेली आहे.

याशिवाय भ्रष्टाचार स्वरूप आणि समस्या, सामाजिक कार्याच्या दिशा, आरक्षण का व कसे?, समता स्वरूप व समस्या, न्याय म्हणजे काय?, लोकशाही स्वरूप व समस्या, डॉ. राधाकृष्णन व्यक्ती व विचार आदी पंचवीस ग्रंथांचे लेखन त्यांनी केलेले आहे.

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, महाराष्ट्र शासन दर्शनिका संपादक मंडळ मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक मंडळ सदस्य होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे ते पहिले सामाजिकशास्त्राचे अधिष्ठाता आणि व्यवस्थापन परिषदेचे सदस्य होते. तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. त्यांच्या कार्याला महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार, अखिल भारतीय समाजनिष्ठ शिक्षक पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचा शं. वा. किर्लोस्कर श्रेष्ठता पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा डॉ. आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, वर्धा येथील दाते संस्थेचा जीवनगौरव पुरस्कार, सातारा येथील संस्थेचा म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## आरसीसी स्कॉलरशिप परीक्षा रविवारी : प्रा. मोटेगावकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** लातूर येथील प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या आरसीसी क्लासेसच्या वाटणे अकरावीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी




येत्या रविवारी स्कॉलरशिप परीक्षा घेण्यात येणारसाळ्याचीमाहिती प्रा. मोटेगावकर यांनी दिली. अकरावीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ९० टक्क्यांपर्यंत स्कॉलरशिप देण्यात येणार आहे. त्यासाठी रविवारी ही परीक्षा घेतली जाणार आहे. रविवार, दि. १४ डिसेंबर रोजी सकाळी अकरा वाजता ही परीक्षा होणार आहे.

राज्यातील एकूण ५० पेक्षा अधिक शहरात ही परीक्षा एकाच वेळी घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे. या परीक्षेसाठीचीनोंदणी आरसीसी च्या वेबसाईटवर विनामूल्य करता येणार आहे.आरसीसीच्यावतीने मागच्या २४ वर्षांपासून गुणवत्तापूर्ण अध्यापनाच्या बळावर विश्वास संपादन करण्याचे काम आरसीसने केले आहे.

निकालातकायम सातत्य राखणाऱ्या प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या आरसीसी क्लासेसच्या वतीने दरवर्षी केवळ राज्यातीलच नव्हे तर अन्य राज्यातीलही गुणवंत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पालकांच्या मुलांसाठी अशा प्रकारच्या स्कॉलरशिप पैशांचे आयोजन केले जाते. या परीक्षेसाठी राज्य मंडळ, सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांना पीसीबी ग्रुपसाठी व इंजिनिअरिंग ग्रुपसाठी १० वी विज्ञान व गणित हे अभ्यासक्रमाचे विषय आहेत. ही परीक्षा ४०० गुणांची व ९० मिनिटांची असणार आहे. या परीक्षेसाठी नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेचे ठिकाण एसएमएसद्वारे तसेच हॉल तिकिट्सद्वारेकळविण्यात येईल, असेही प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी सांगितले.

## न्याय मागण्यांसाठी विधानभवनवर मोर्चा : ॲड. वाघमारे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त महासंघाच्या वतीने येत्या दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर विधानभवनवर शासन मान्य विविध पुरस्कार विजेत्यांच्या न्याय मागण्यांसाठी भव्य मोसाई काढण्यात येणार असल्याची माहिती महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेनेचे महाराष्ट्र राज्य समन्वयक ॲड. वैजनाथ वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे पुरस्कार, संत रोहिदास पुरस्कार, दादासाहेब गायकवाड पुरस्कार यांसह विविध पुरस्कार विजेत्यांना मागच्या ३०-४० वर्षांपासून शासनाकडून पुरस्काराच्या सन्मानाशिवाय आतापर्यंत काहीही मिळालेले नाही.

विविध महापुरुषांच्या नावाने देण्यात आलेल्या या पुरस्काराने त्या त्या महापुरुषांचे



विचार जागृत ठेवण्याचे, ते समाजातील तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम ही पुरस्कार विजेती मंडळी अव्याहतपणे करत आहेत. मात्र, ते अनेक सोयी-सुविधांपासून वंचित असल्याचे सांगून ॲड. वैजनाथ वाघमारे पुढे म्हणाले की, या पुरस्कार विजेत्यांना शासनाच्या वतीने दरमहा १५ ते २० हजार रुपये मानधन देण्यात यावे, मंत्रालयात प्रवेशासाठी स्वतंत्र पास उपलब्ध करून द्यावेत, एसटी महामंडळाच्या सर्वच बसेससाठी पुरस्कार विजेता आणि त्यांच्या धर्मपत्नीसाठी मोफत पास देण्यात यावा, पुरस्कार विजेत्यांना विशेष कार्यकारी अधिकारी पदाचे ओळखपत्र देण्यात यावे या मागण्यांसाठी शुक्रवार, दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता यशवंत स्टेडिअमनगापूर ते मॉरिस कॉलेजपर्यंत भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे.

मोर्चा काढून पुरस्कार विजेत्यांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविल्या जाणार आहेत. मोर्च्याच्या हत्यारानंतरही शासनाकडून या मागण्या मान्य नाही झाल्यास सर्व पुरस्कार विजेते शासनाला आपआपले पुरस्कार परत करणार असल्याचेही ॲड. वाघमारे यांनी सांगितले. पुरस्कार विजेत्यांच्या विविध समस्यांची सोडवणूक करण्यासाठी लवकरच वाशीम येथे राज्यस्तरीय मेळावाही घेण्यात येणार आहे.

या मेळाव्याच्या माध्यमातूनही आपण पुरस्कार विजेत्यांच्या मागण्यांची पूर्तता शासनाकडून करून घेण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे ॲड. वैजनाथ वाघमारे यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी व्यंकटराव शिंदे, बालाजी गोटमुकले, शेषेराव करकेलीकर, प्रकाश घादगिने, रमेश जोंधळे यांसह मान्यवरांची उपस्थिती होती.

## १० टन गोमांस भरलेला ट्रक पकडला

### अ.भा. कृषी गोसेवा महासंघाची कारवाई । चाकूर पोलीसांच्या ताब्यात सुपूर्द

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** अखिल भारतीय कृषी गोसेवा महासंघाच्या कार्यकर्त्यांनी मोठी धडक कारवाई करत जवळपास १० टन गोमांसाने भरलेला ट्रक ताब्यात घेत चाकूर पोलिसांच्या हवाली केला. महाराष्ट्रात गोमातेचा राज्यमाता म्हणून सन्मान असताना आणि राज्यात गोहत्याबंदी कायदा लागू असतानाही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गोवंशाची कत्तल होत असल्याचा गंभीर मुद्दा या कारवाईतून पुन्हा एकदा समोर आला आहे.

या कारवाईत संघटनेचे आदर्श जैन, जोतिराम क्षिरसागर, विजय भिसे, इटकर यांच्यासह एकूण चार गोरक्षक सहभागी होते. गोरक्षकांनी




मिळालेल्या माहितीच्या आधारे ही संयुक्त कारवाई करून ट्रक पकडत पोलिसांच्या ताब्यात दिला. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, जिल्ह्यात अनधिकृत गोवंश वाहतूक आणि कत्तलीचे प्रकार वाढत असून, अशा बेकायदेशीर कृत्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी गोरक्षक सतत कार्यरत आहेत. पोलीस प्रशासनानेही या प्रकरणाचा तपास सुरू केला असून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

## २० डिसेंबर रोजी मद्यविक्री बंद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार निलंगा नगरपरिषद आणि रेणापूर नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. तसेच दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील उदगीर, अहमदपूर, औसा, निलंगा नगरपरिषद आणि रेणापूर नगरपंचायतीची मतमोजणी होणार आहे. त्यामुळे २० डिसेंबर रोजी निलंगा नगरपरिषद व रेणापूर नगरपंचायत हद्दीतील सर्व प्रकारची मद्यविक्री बंद राहणार आहे. तसेच २१ डिसेंबर रोजी उदगीर, अहमदपूर, औसा, निलंगा नगरपरिषद आणि रेणापूर नगरपंचायतीची मतमोजणी होणाऱ्या ठिकाणची सर्व प्रकारची मद्यविक्री बंद राहणार आहे.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी महाराष्ट्र मद्य निषेध कायदा, १९४९ व महाराष्ट्र विदेशी मद्य (रोखीने विक्री, मद्यविक्री नोंदवही इ.) नियम १९६९ च्या संबंधित कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

## अभाविप स्थायी कार्यकर्त्यांचे लातूरमध्ये एकत्रीकरण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** लातूर शाखेच्या वतीने ७ डिसेंबर रोजी स्वर्गीय प्रा. यशवंतराव केळकर यांच्या जन्मशताब्दी वर्ष व पुण्यस्मरणाच्या निमित्ताने स्थायी कार्यकर्त्यांचे दिवसभराचे एकत्रीकरण उत्साहात पार पडले. लातूर, उदगीर, धाराशिव आणि अंबाजोगाई येथील शेकडो स्थायी कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमास उपस्थिती दर्शवून संघटनात्मक कामात सातत्याने योगदान देण्याची तयारी दर्शवली.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संजय पाचपोर उपस्थित होते. तसेच देवदत्त जोशी यांनी प्रमुख उपस्थिती नोंदवत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.दिवसभर चाललेल्या या एकत्रीकरणात संघटन बळकटीकरण, युवा सहभाग, सामाजिक उपक्रम, भविष्यातील नियोजन या विषयांवर विविध सत्रांद्वारे चर्चासत्रे




झाली. प्रा. यशवंतराव केळकर यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवत, कार्यकर्त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत अधिक प्रभावी पद्धतीने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी कार्यकर्त्यांच्या योगदानाचे कौतुक करत संघटनात्मक कार्याला नवी ऊर्जा देण्याचे आवाहन केले.


## समाजवादी विचाराचा नेता गमावला : कव्हेकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** महाराष्ट्राच्या समाजसेवा आणि श्रमिक चळवळीचे प्रणेते असलेले समाजवादी नेते मानवतावादी विचारवंत, रिक्षाचालक, हमाल, मोलमजुरी करणारे असंघटीत कामगार यांच्या हक्कासाठी आयुष्यभर लढा देणारे बाबा आढाव यांचे वयाच्या ९६ व्यावर्षी पुना हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले. ही दुःखद घटना आहे. साधेपणा, तत्त्वानिष्ठा आणि न्यायासाठीच्या संघर्षासाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी ठरलेले आहे. त्यांच्या कार्यातून सहकार आणि श्रमिक चळवळ ही आपल्या समाजाची अमुल्य संपदा आहे. त्यांच्या निधनाने श्रमिक चळवळीचे मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे खर्या अर्थाने कष्टकर्यांसाठी लढणारा समाजवादी विचाराचा नेता महाराष्ट्राने गमावला असल्याची खंत भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केली.

डॉ.बाबासाहेब पांडुरंग आढाव हे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचे एक खंदे योध्दे आणि श्रमिक कष्टकर्यांचे खरे कैवारी होते. पुण्यात जन्मलेले बाबा आढाव १९७० च्या दशकामध्ये पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक होते.

लातूरसह महाराष्ट्रातील हमाल, मापाडीसाठी माथाडी



बोर्ड लागू करण्याचे काम बाबा आढाव यांच्या प्रेरणेने केले असून त्यांच्या खात्यावर कोट्यवधीचा निधी जमा करण्याच्या प्रक्रियेतही त्यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे.

अस्पृश्यता, जातीय भेदभाव यांच्याविरूध्द आयुष्यभर लढणारे बाबा आढाव हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे कट्टर अनुयायी होते. त्यांच्या निधनामुळे श्रमिक चळवळीचे एक मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व हरवले आहे.

त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी भावनिक प्रतिक्रियाही माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केली.

## 'आपत्ती व्यवस्थापन'वर परिचारिकांसाठी कार्यशाळा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर येथे महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन या विषयावर परिचारिकांसाठी निशुल्क निरंतर व्यावसायिक शिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच मा. न्यायालयाच्या आदेशानुसार नोंदणी नूतनीकरणासाठी आवश्यक असलेल्या १५० क्रेडिट तास मिळविण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन जाधव, अध्यक्षपदी महाराष्ट्र परिचर्या परिषदेचे उपाध्यक्ष व संघटनेचे राज्यकार्याध्यक्ष अरुण कदम, अधिसेविका श्रीमती लक्ष्मीबाई आपटे, प्राचार्या श्रीमती अश्विनी बेले, महाराष्ट्र राज्य परिचारिका




संघटनेच्या राज्याध्यक्षा डॉ. मनीषा शिंदे, राज्यउपाध्यक्ष भीमराव चक्रे, अंबाजोगाई शाखाध्यक्षा श्रीमती आशा यादव, कार्यशाळा निरीक्षक अझर शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिमा पूजनाने करण्यात आली. प्रास्ताविक राज्य सरचिटणीस सुमित्रा तोटे यांनी केले. वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन जाधव यांनी मार्गदर्शन करताना नर्सिंग ऑफिसरचे रुग्णसेवेत महत्त्व अधोरेखित केले व अशा शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक केले. राज्य उपाध्यक्ष भीमराव चक्रे यांनी निरंतर शिक्षणाबरोबरच परिचारिकांमध्ये परस्पर संवाद आणि मानसिक आरोग्य वृद्धीचे महत्त्व सांगितले.

डॉ. मनीषा शिंदे, अधिसेविका अपाटे यांनी संघटनेच्या कार्याचे कौतुक केले. कार्यशाळा निरीक्षकांनी दिवसभरातील विषय आत्मसात करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात अरुण कदम यांनी ज्ञानार्जनाची गरज अधोरेखित करत आयोजकांचे अभिनंदन केले.

या कार्यशाळेत डॉ. मनीषा शिंदे, अनंत पवार, डॉ. आदिम सय्यद, शुभम वानखेडे, विवेकानंद कोडगिरे, विरेश महाजनी यांसारख्या तज्ज्ञांनी आपत्ती व्यवस्थापन विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रुपाली दिघे व अश्विनी विपत यांनी केले तर आभारप्रदर्शन राज्य खजिनदार राम सूर्यवंशी यांनी केले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी राज्य कार्यकारिणी सदस्य पांडुरंग गव्हाणे, अध्यक्ष छाया चव्हाण, उपाध्यक्ष संजीव लहाने, मार्गदर्शक योगेश वाघ, सचिव भाग्यश्री जोगदंड, खजिनदार रंजना भताने, सहसचिव भगवान केंद्रे, संघटक बालिका सावंत, सहखजिनदार दीपक शिंदे, तसेच संभाजी केंद्रे, भागवत मुंडे, शुभम वानखेडे, सुधाकर केदार, अमित मालिशे, निशा जाधव, कृष्णा नागरगोजे, विक्रांत हुलसुरे, संतोष केंद्रे, भाग्येश्वर वागलगावे, सतीश माळकरी आणि इतर सर्व पदाधिकारी व सभासदांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली.

## थोडक्यात...

### जरंडीत आरओ फिल्टर व पिठगिरणीचे उद्घाटन



**सोयगाव, दि.१० डिसेंबर :** महिलांना आर्थिक बळकटीकरण देण्यासाठी जरंडी ग्रामपंचायतीचा वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत उत्पन्न वाढीसाठी मंगळवारी (दि.९) शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी आर ओ प्लॅन्टचे व पिठगिरणीचे उद्घाटन सरपंच स्वातीताई पाटील यांच्या हस्ते करण्यात आले ग्रामस्थाना नाममात्र पिठगिरणीतुन दळण करून देण्यात येणार असल्याचे सरपंच स्वातीताई पाटील यांनी सांगितले. यावेळी उपसरपंच संजय पाटील, विस्तार अधिकारी सुनील राकडे, दिलीप पाटील, अमृत राठोड, माजी पंचायत समितीचे सदस्य संजीवन सोनवणे, मधुकर पाटील, मधुकर सोनवणे, सिद्धार्थ मोरे, श्रीराम पाटील, भिवा चव्हाण, माधव मोहिते,सोयगावचे माजी उपनगराध्यक्ष योगेश पाटील, शिवसेना महिला आघाडीच्या धृपता बाई सोनवणे, आदींची उपस्थिती होती. सतिष बाविस्कर, संतोष पाटील, भास्कर निकम् आदींनी पुढाकार घेतला.

### एमजीएममध्ये हस्तकला प्रदर्शनाचे उद्घाटन



**छत्रपती संभाजीनगर, दि. १० डिसेंबर :** केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयांतर्गत दिनांक ८ ते १४ डिसेंबर २०२५ दरम्यान राष्ट्रीय हस्तकला सप्ताह साजरा करण्यात येत आहे. याचाच भाग म्हणून हस्तकला सेवा केंद्र, छत्रपती संभाजीनगर आणि एमजीएम विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय दिवसीय हस्तकला प्रदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे विद्यापीठाच्या चिंतनगाह येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले. या उद्घाटन कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, हस्तकला सेवा केंद्राचे सहाय्यक संचालक अमन कुमार जैन, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई, अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख, संचालिका शुभा महाजन, रमाकांत रुपचंद सूर्यवंशी उपस्थित होते.

### एमजीएममध्ये हिंदी एकांकिकेच्या प्रयोगाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, दि.१० डिसेंबर :** महात्मा गांधी मिशन संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त एआयु'च्या झोनल युथ फेस्टिवलमध्ये एमजीएम विद्यापीठाच्या संघाची 'तिनके का सहारा' ही हिंदी एकांकिका चर्चेची ठरली होती. याच एकांकिकेचा प्रयोग शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता रुक्मिणी सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. एमजीएम विद्यापीठाचे संशोधक विद्यार्थी रामेश्वर झिंजुर्डे लिखित-दिग्दर्शित 'तिनके का सहारा'मध्ये यज्ञदा जोशी, पल्लवी बेद्रे, विनिशा बोरसे, प्रणाली औताडे, अभिजीत तांगडे, प्रथमेश सैंदाणे, असेफ शेख, प्रतीक आडे, महेश नलावडे यांच्या भूमिका आहेत. सदर प्रयोगास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर व सर्व संबंधित मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

### ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये महामानवाला अभिवादन




**बिडकीन, दि.१० डिसेंबर :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये ६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला आणि मुख्याध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यानंतर विद्यार्थ्यांना बाबासाहेबांच्या महान जीवनकार्याची माहिती देण्यात आली. ज्ञानेश्वर चव्हाण यांनीही डॉ. आंबेडकर यांच्या विचारधारणा, समाजसेवा व संविधान निर्मितीतील योगदानाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचालन शिक्षक कृष्णा भालेराव यांनी केले.

### आयडीएफसी फर्स्ट बँकेने फर्स्ट वॉव! ब्लॅक लाँन्च

**मुंबई :** आयडीएफसी फर्स्ट बँकेने आज फर्स्ट वॉव! ब्लॅक क्रेडिट कार्ड लाँन्चची घोषणा केली विद्यमान फर्स्ट वॉव! क्रेडिट कार्डची अपग्रेडेड आणि अधिक वैशिष्ट्यपूर्ण आवृत्ती, ज्याला फिक्स्ड डिपॉझिटद्वारे समर्थित केले आहे. हे एफडी बॅक्ड सिक्युअर्ड कार्डवर प्रीमियम फायद्यांसाठी, परवडणाऱ्या किमतीत डिझाइन केले आहे. कार्डचे प्रमुख आकर्षण म्हणजे आंतरराष्ट्रीय खर्चावर शून्य एफएक्स मार्कअप, मास्टरकार्ड आणि रुपे यूपीआयसह ड्युअल कार्ड आणि यूपीआय खर्चावर रिवॉर्ड्स. कार्डधारकांना एक भौतिक मास्टरकार्ड आणि यूपीआय-सक्षम रुपे व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड मिळते, जे एकाच खात्याशी एकीकृत क्रेडिट मर्यादा आणि एकच एकत्रित स्टेटमेंटसह अखंडपणे जोडलेले असते.

### लाईव्ह इव्हेंट्स पाहणाऱ्यांची संख्या वाढली

**पुणे :** २०२५ हे वर्ष संपत असताना, भारतातील आघाडीचे मनोरंजन केंद्र असलेल्या बुकमायशो ने बुकमायशोथ्रोबॅक२०२५ लाँच केले आहे. हे अशा वर्षाचे सेलिब्रेशन आहे, जिथे मनोरंजन केवळ क्षणिक न राहता, एक चळवळ बनले. हे असे वर्ष होते, जिथे भारताने केवळ मनोरंजनाचा उपभोग घेतला नाही, तर त्याची निवड केली, स्वीकार केला आणि जाणीवपूर्वक ते जगले. विक्रम मोडणाऱ्या चित्रपटांपासून ते उत्साहवर्धक थेट कार्यक्रमांपर्यंत, २०२५ ने हे सिद्ध केले की भारतीयांसाठी घराबाहेर पाऊल टाकणे हे सहज घेतलेला निर्णय नव्हता, तर ते आवश्यक होते.

### पॅन सीएमईमध्ये जीएमसी जळगावात विद्यार्थ्यांचा उत्साह

**जळगाव :** फिजिशियन असोसिएशन फॉर न्यूट्रिशन यांनी एव्हिडन्स-बेस्ड न्यूट्रिशन फॉर मेडिकल प्रॅक्टिस अँड एनसीडी प्रिव्हेन्शन या विषयावर जीएमसी जळगावमध्ये सीएमई आयोजित केले. २०० पेक्षा अधिक वैद्यकीय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, ज्यातून क्लिनिकल न्यूट्रिशनविषयी वाढती रुची स्पष्ट झाली. सत्रांमध्ये संपूर्ण-आहार वनस्पती-आधारित पोषण हे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि स्थूलता यांसारख्या एनसीडी च्या प्रतिबंधासाठी प्रभावी उपाय असल्याचे तज्ज्ञांनी अधोरेखित केले.

# महावितरण संचालक राजेंद्र पवार 'दिव्यांग भूषण २०२५'ने सन्मानित

**छत्रपती संभाजीनगर, दि. १० डिसेंबर :** महावितरणमधील दिव्यांग अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी 'देवदूत' ठरलेल्या एका महत्त्वाच्या व्यक्तीचा नागपूर शहरात गौरव झाला. महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांना मंगळवारी, ९ डिसेंबर रोजी 'दिव्यांग भूषण पुरस्कार २०२५' या अत्यंत प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य अपंग (दिव्यांग) कर्मचारी/अधिकारी संघटना, मुंबई यांच्या वतीने नागपूर येथे आयोजित एका सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महावितरणमध्ये कार्यरत असणाऱ्या दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी त्यांनी केलेल्या अतुलनीय आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेऊन त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात आला आहे.

राजेंद्र पवार यांनी त्यांच्या कार्यकाळात दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या हितासाठी अनेक मैलाचे दगड ठरतील असे निर्णय घेतले. विशेषतः दिव्यांगांना पदोन्नती आणि नियुक्ती प्रक्रियेत कोणत्याही परिस्थितीत योग्य न्याय मिळावा यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे आणि त्यांना संस्थेमध्ये इतरांप्रमाणे समान संधी मिळाव्यात, याकरिता त्यांचे धोरण



नेहमीच सकारात्मक, संवेदनशील आणि निर्णायक राहिले आहे.

यावेळी पुरस्कार प्रदान करताना संघटनेच्या विद्युत विभागाचे अध्यक्ष विलास शिंदे यांनी पवार यांच्या कार्याची प्रशंसा केली. ते म्हणाले, राजेंद्र पवार यांची ऊर्जा क्षेत्रातील अभिजात प्रज्ञा आणि प्रतिभा यांच्या बळावर त्यांनी केलेले अलौकिक कार्य तसेच त्यांची कामगिरी ही केवळ कर्तव्य म्हणून नव्हे, तर भावनिक आणि सामाजिक जबाबदारीने केलेली आहे. याच अतुलनीय कार्याबद्दल त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे.

दिव्यांग अधिकारी/कर्मचारी संघटनेने श्री. पवार यांच्या मानव संसाधन क्षेत्रातील अद्वितीय योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. संघटनेच्या मते, श्री. राजेंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली महावितरणने दिव्यांगांना न्याय देण्यासाठी घेतलेले निर्णय हे इतर सरकारी संस्थांसाठी एक आदर्शवत पायंडा ठरणारे आहेत. हा 'दिव्यांग भूषण पुरस्कार २०२५' त्यांच्या याच दूरदृष्टीच्या आणि कल्याणकारी दृष्टिकोनाचा गौरव आहे.

या सोहळ्याला संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री. सुभाष चव्हाण, रंजन बल्लमवार आणि महावितरणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके यांच्यासह संघटना आणि महावितरणचे अनेक अधिकारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांनी टाळ्यांच्या कडकडाटात श्री. पवार यांच्या कार्याला सलाम करत त्यांचे अभिनंदन केले.

## महामानवाच्या परिसस्पर्शामुळे महानगराचे सोने : डॉ. धारूरकर

**छत्रपती संभाजीनगर, दि. १० डिसेंबर :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या




विचार, कार्य आणि प्रत्यक्ष सहभागामुळे छत्रपती संभाजीनगरचे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक रूपांतर 'महानगर' म्हणून झाले, असे ठाम प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत व माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारूरकर यांनी केले. इतिहास विभाग, स्त्री अभ्यास केंद्र व हिस्टरी सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील स्त्री संशोधन केंद्रात आयोजित 'छत्रपती संभाजीनगर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावरील परिसंवादात ते प्रमुख अतिथी व उद्घाटक म्हणून बोलत होते.

डॉ. धारूरकर यांनी सांगितले की, १३ जुलै १९३३ रोजी डॉ. आंबेडकर प्रथम संभाजीनगरला आले आणि पुढील दोन दशके ते शहराच्या सार्वजनिक जीवनाशी सक्रियपणे जोडले गेले. नागसेनवन परिसरात स्थापन झालेल्या मिलिंद महाविद्यालयातूनच विद्यापीठाच्या शैक्षणिक पुनर्रचनेची मजबूत पायाभरणी झाली. मराठवाड्यात स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची संकल्पना याच प्रक्रियेतून साकार झाली.

सामाजिक-आर्थिक पुनर्रचना, दलित महिलांचा हैदराबाद मुक्तिसंग्रामातील सहभाग, तसेच 'ऑपरेशन पोलो'ला मिळालेले वैचारिक अधिष्ठान यावर त्यांनी प्रकाश टाकला. डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथलेखनासही संभाजीनगरमध्ये प्रारंभ झाल्याचे त्यांनी नमूद केले.

या परिसंवादात डॉ. दीपक गायकवाड, डॉ. पुष्पा गायकवाड, डॉ. बिना शेंगर व प्राचार्या वैशाली प्रधान यांनी विचार मांडले. डॉ. संजय पाईकराव यांनी सूत्रसंचालन केले, तर कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## बिबट्याचा वाढता उपद्रव; बनशेंद्र्यात गायीचा बळी

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि.१० डिसेंबर :** तालुक्यात बिबट्याच्या हल्लयांच्या घटना वाढत असून गट क्र. ७९, बनशेंद्रा येथे बुधवारी पहाटे बिबट्याने गायीवर हल्ला करून ती ठार मारल्याची घटना समोर आली आहे. साहेबराव सर्जे राव गायकवाड यांची ही गाय असून अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटना घडताच वन विभागाच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट दिली. वाढत्या हल्लयांवर प्रतिक्रिया देताना आर.एफ.ओ. शिवाजी टोंपे यांनी सांगितले की, बिबट्याची हालचाल या परिसरात काही दिवसांपासून जाणवत होती. लोकांनी खबरदारी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे. पशुधन सुरक्षित ठेवण्यासाठी रात्रीच्या वेळी जनावरे गोठ्यात बांधून ठेवावीत. तसेच कोणतीही हालचाल दिसल्यास त्वरित वन विभागाशी संपर्क साधावा. टोंपे यांनी पुढे सांगितले की वन विभाग परिस्थितीवर पूर्णपणे लक्ष ठेवून असून पिंजरा लावण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या घटनेनंतर बनशेंद्रा आणि आसपासच्या गावांतील नागरिकांमध्ये चिंता वाढली असून वाढत्या बिबट्या हल्लयांमुळे बळीराजांच्या पशुधनास धोका निर्माण होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## 'फॅमिली डॉक्टर' संकल्पना बंद होणे हानिकारक : डॉ. बोरकर




**छत्रपती संभाजीनगर, दि. १० डिसेंबर :** एकेकाळी शहरी व ग्रामीण पातळीवर प्रत्येक कुटुंबाशी दीर्घकालीन नाते असलेला 'फॅमिली डॉक्टर' ही संकल्पना आरोग्यसेवेचा कणा होती. मात्र, सद्यस्थितीत ही संकल्पना लोप पावत असून त्याचा थेट परिणाम रुग्ण-डॉक्टर विश्र्वाससाखळीवर होत आहे. ही बाब आरोग्य व्यवस्थेसाठी हानिकारक आहे, असे प्रतिपादन घाटी रुग्णालयाच्या माजी वार्धक्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मंगला बोरकर यांनी केले.

अंबाजोगाई येथील ज्येष्ठ फिजिशियन डॉ. शुभदा राठी-लोहिया लिखित 'रुग्णांच्या चषम्यातून' या पुस्तकाच्या, डॉ. काजल भंडारी-मुंदडा यांनी केलेल्या इंग्रजी अनुवाद 'Unveiling Healing'च्या प्रकाशनप्रसंगी त्या बोलत होत्या. रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील प्रभावी संवाद व सुसंवाद रुग्णालयातील तणावपूर्ण व अप्रिय घटनांना आळा घालू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः वृद्ध रुग्णांशी संवेदनशील संवादाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

पुस्तकावर भाष्य करताना डॉ. शिरीष खेडगीकर यांनी मूळ आशय व शैली कायम ठेवल्यामुळे अनुवाद दर्जेदार झाल्याचे सांगितले. रुग्ण संवादासह सर्व 'सॉफ्ट स्किल्स' वैद्यकीय विद्यार्थी व नवपदवीधर डॉक्टरांनी आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास प्रा. रामेश्वर राठी, कमला राठी, प्रा. अभिजीत लोहिया, उद्योजक दिलीप मुंदडा यांच्यासह वैद्यकीय व शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फार्मसी महाविद्यालयात नवागतांचे स्वागत



**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि.१० डिसेंबर :** शहरातील श्री छत्रपती शिवाजी फार्मसी महाविद्यालयात डी.फार्मसी आणि बी.फार्मसीच्या नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. प्रमुख पाहुण्या म्हणून सहाय्यक पोलीस अधीक्षक आयपीएस अपराजिता अग्निहोत्री उपस्थित होत्या.

समारंभाचे अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव चंद्रकांत अण्णा देशमुख होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर यांनी स्वागतपर भाषणातून महाविद्यालयातील उपक्रमांची माहिती दिली. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी अपराजिता अग्निहोत्री यांनी विद्यार्थीजीवनातील शिस्त, स्वअनुशासन आणि कर्तव्यनिष्ठेचे महत्त्व सांगत फार्मसी क्षेत्रातील संधी व प्रगतीबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात देशमुख यांनी संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक आणि प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. कविता भामरे यांनी केले.

## जीएलएस यूनिवर्सिटीची एसएई इन्स्टिट्यूट सोबत भागीदारी

**मुंबई :** जीएलएसयूनिवर्सिटीने ऑस्ट्रेलियातील एसएई इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने आपला 'ग्लोबल बी. डिजाइन प्रोग्राम सुरू केला असून, हा भारतातील क्रिएटिव्ह मीडिया शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. ॲनिमेशन आणिवीएफएक्स तसेच गेम डेव्हलपमेंट या जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त विशेष शाखांसह चार वर्षांचा हा अभिनव पदवी कार्यक्रम देशात पहिल्यांदाच सुरू होत आहे. गुजरात लॉ सोसायटी द्वारे १९२७ मध्ये स्थापन झालेले जीएलएस यूनिवर्सिटी, गुजरातमधील सर्वात प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांपैकी एक आहे. एसएईइन्स्टिट्यूटचा आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम आणि प्रमाणपत्र देण्यासाठी भारतातील एकमेव अधिकृत संस्था म्हणजे जीएलएस यूनिवर्सिटी. या सहकार्याद्वारे एसएई इन्स्टिट्यूटने भारतीय बाजारपेठेत अधिकृत प्रवेश केला असून, देशातील वेगाने वाढणाऱ्या क्रिएटिव्ह उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची पुनरुज्जीविती झाली आहे.

## शिवाजी हिंगे यांचे निधन



**कन्नड :** शहरातील जवाहर कॉलनीतील रहिवासी शिवाजी त्र्यंबक हिंगे वय ४४ यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दि.०९ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास निधन झाले. शिवाजी हिंगे यांचा मनमिळाऊ स्वभाव होता त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगी, एक मुलगा असा परिवार होता,सायंकाळी ०५ :३० वाजता देवलोक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

**CHENGE IN NAME**

HAVE CHENGE IN MY NAME FOR PASSPORT ISSUANCE
OLD NAME -**RITESH VILASRAO LOKHANDE**
NEW NAME - **RITESH VILAS LOKHANDE**
- PRESENT ADDRESS -
**AT POST. PARADH,**
**TQ. BHOKARDAN**
**DIST JALNA (MAHARASHTRA)**
**MAHARASHTRA - 431114**
**MOB. NUMBER : 9146043209**

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हिल एम.ए. क्र.८९३/२०२५

अर्जदार :- १) सोपान बालचंद निळ, वय ४३ वर्ष धंदा शेती, २) साईनाथ बालचंद निळ, वय ४० वर्ष धंदा शेती, ३) विमल पि. बालचंद निळ, वय ६० वर्ष धंदा शेती, दोघे रा. बकवालनगर, नायगाव ता. गंगापूर जि. औरंगाबाद, ४) कमलबाई भ. नंदू चव्हाण, वय ४३ वर्ष धंदा गुंहिणी रा. आपेगाव ता. गंगापूर जि. औरंगाबाद, ५) शशिकला भ. कल्याण निळ, वय ५७ धंदा गुंहिणी, रा. जिकठाण ता. गंगापूर जि. औरंगाबाद, ६) सौ. मीरा नंदकुमार घायाळ, वय ३५ वर्ष धंदा गुंहिणी, रा. ईमानपुर ता. पैठन जि. औरंगाबाद ७) सौ. हिराबाई नि.केश देवकर, वय २९ वर्ष धंदा गुंहिणी रा. रामराई ता. गंगापूर जि. औरंगाबाद ८) सौ. तारा योगेश लामखडे, वय २६ वर्ष धंदा गुंहिणी रा. माहुली ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण - कलम २ बॉम्बे रेग्युलेशन क्ट प्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे वि. ज. ॲड. श्री. दि. के. तारू याच्या मार्फत अर्ज सादर केला की, बालचंद माधव निळ व सोमाबाई बालचंद निळ हे NaN पत्नी असुन ते मौजे नायगाव ता. गंगापूर येथें मयत झालेली बालचंद माधव निळ हे दिनांक १२/०५/२०२४ रोजी मौजे नायगाव ता. गंगापूर येथे मयत झालेले असुन सोमाबाई बालचंद निळ या दिनांक १४/०८/२०१० रोजी मयत झालेल्या आहे. दोन्ही मयतांना अर्जदार क्र. १ व २ आणि कल्याण हे तीन मुले व अर्जदार क्र. ३ व ४ मुळी असे कायदेशेर वारसदार आहे, त्यापैकी कल्याण बालचंद निळ हे दिनांक ०८/०८/२००३ रोजी मयत झाले असुन मयत कल्याण बालचंद निळ यां.ना हि विधवा पत्नी असून असे वारसदार आहे, घेणे प्रमाणे मयत बालचंद माधव निळ यांना अर्जदार क्र. ९ ते अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशेर वारसदार नसल्याचे नमूद हे कायदेशेर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशेर वारसदार नसल्याचे नमूद करुन अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमापत्राची मागणी केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जतील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांच्या असलेला आक्षेप, उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिद्ध झाले तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांणी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्यानी आज दिनांक ०८/१२/२०२५ दिले. प्रकरणांत पुढील तारीख दिनांक १९/०९/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

**वरिष्ठ/ कनिष्ठ लिपीक**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर**

दि. क्र. अर्ज नं. ८३४/२०२५

अर्जदार - १) शिवनाथ पि. कडू निकम,वय- ६९ वर्ष, धंदा - शेती,२) रामेश्र्वर पि. कडू निकम,वय- ५० वर्ष, धंदा- शेती, वरील दोघे रा. शेंदुरवाडा ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर३) भिमबाई भ. श्रीधर गवदे, वय-६५ वर्ष, धंदा-गुहीणी,रा. रांजणगांव खुरी, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर४) लता भ. रमेश बरदेवय - ५५ वर्ष, धंदा - गुहीणी,रा. ढोरकीण ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) पुष्पा भ. जगन्नाथ शिंदे वय-४७ वर्ष, धंदा - गुहीणी, रा. पैठण ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर

६) अनिता भ. सिताराम बोंबले वय-३८ वर्ष, धंदा - गुहीणी,रा. पाचगाव ता. पैठण व जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - वारस प्रमाणपत्र (सक्सेशन सर्टिफिकेट) मिळणेबाबत..

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विधिज्ञ एम.बी. गुडदे यांच्या मार्फत अर्ज सादर केला की, त्यांची आई भगुबाई कडू निकम ह्या दिनांक २२/०९/२०२५ रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जदार हे मयत भगुबाई कडू निकम यांचे एकमेव कायदेशीर वारस आहे. अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाही. मयत भगुबाई कडू निकम यांच्या नावे महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा शेंदूरवादा येथे असलेली रक्कम अर्जदार क्र. १ यास मिळण्याकामी अर्जदारांनी मयत भगुबाई कडू निकम यांचे वारस असल्याबदलेचे कायदेशीर वारस प्रमाणपत्रार्था मागणी या न्यायालयस केली आहे. त्याअर्थी वरील अर्जदारांच्या नावे मयत भगुबाई कडू निकम यांचे कायदेशीर वारस असल्याबद्दलचे प्रमाणपत्र देण्यास कोणावीही हरकत, आक्षेप असेल तर त्यानी सदर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा त्यांच्या विधिसंमत हजर होऊन आपला आक्षेप मांडावे. मुदतीनंतर कोणाचाही आक्षेप स्वीकारल्या जाणार नाही व सदर अर्जास कुणावीही हरकत, आक्षेप नाही असे समजून वरील सर्व अर्जदारांच्या नावे ते मयत भगुबाई कडू निकम यांचे कायदेशीर वारस असल्याबदलचे वारस प्रमाणपत्र देण्यांत येईल. करीता आज दिनांक १० /१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी देण्यांत येत आहे.

**कनिष्ठ लिपिक**
**स्वाक्षरीत**
**सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय गंगापूर**

जा.क्र.जे-१/नोटीस/ ६३५७/२०२५,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, छ. संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
दिनांकः- ३ डिसेंबर २०२५
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.

### चौकशीची जाहीर नोटीस

**(नमुना क्रमांक. २)**

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० याचे कलम- किरकोळअन्वये)

सन २०२५ चा अर्ज क्रमांक ७६३/२०२५ कलम- किरकोळ सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थाः परीवर्तन बहुउददेशीय शिक्षण संस्था, औरंगाबाद एफ-२४६४८

अर्जदार :- चंद्रकांत व्यंकटराव मल्हारे रा. आर एच १०७/बजाजनगर एम आय डी सी वाळूज वडगाव कोल्हाटी औरंगाबाद

गैरअर्जदार :- ०२.तस्लीमुद्दीन तमिझुद्दीन शेख, घर नं.४-३-६२, खोकडपुरा, ओरंगाबाद. ०३. गझाला बेगम तस्लीमुद्दीन शेख, घर नं.४-३-६२, खोकडपुरा, ओरंगाबाद.

ज्या अर्थी मा.धर्मादाय उप आयुक्त, छ. संभाजीनगर विभाग छ. संभाजीनगर यांच्या कडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधात वरील किरकोळ अर्जान्वये कलम किरकोळ प्रमाणे नोंदी दाखल करण्यासाठी चौकशी करण्यात येणार आहे.

त्याअर्थी गैरअर्जदार यांना चौकशीची जाहीर नोटिस वृत्तपत्रातुन प्रसिध्द करण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, मा. धर्मादाय उप आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे. आणि चौकशीसंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीया तोंडी व दस्तऐवजांच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरील सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे. आज दि.०३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व धर्मादाय उप आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

अधीक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.जे-१/नोटीस/ ६३३६/२०२५,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, छ. संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
दिनांक : ०३ डिसेंबर २०२५
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.

### चौकशीची जाहीर नोटीस

**(नमुना क्रमांक. २)**

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० याचे कलम- किरकोळ अन्वये)

सन २०२५ चा अर्ज क्रमांक ७६२/२०२५ कलम-किरकोळ सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थाः परीवर्तन बहुउददेशीय शिक्षण संस्था, औरंगाबाद एफ-२४६४८

अर्जदार :- चंद्रकांत व्यंकटराव मल्हारे रा. आर एच १०७/बजाजनगर एम आय डी सी वाळूज वडगाव कोल्हाटी औरंगाबाद

गैरअर्जदार :- ०२. शेख शब्बीर लाल शेख, घर नं.२-६-११३, रंगारगल्ली, ओरंगाबाद. ०३. शेख सबा नाजमीन शेख अब्दुल वहीद, घर नं.४-१७-५८, मिल कोर्नर, कोतवालपुरा औरंगाबाद.

ज्या अर्थी मा.धर्मादाय उप आयुक्त, छ. संभाजीनगर विभाग छ. संभाजीनगर यांच्या कडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधात वरील किरकोळ अर्जान्वये कलम किरकोळ प्रमाणे नोंदी दाखल करण्यासाठी चौकशी करण्यात येणार आहे.

त्याअर्थी गैरअर्जदार यांना चौकशीची जाहीर नोटिस वृतपत्रातुन प्रसिध्द करण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, मा. धर्मादाय उप आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसाच्या आत वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे. आणि चौकशीसंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोंडी व दस्तऐवजांच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे. आज दि.०३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व धर्मादाय उप आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

अधीक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

## अग्रलेख...

# स्मरण समर गीताचे

८ डिसेंबर २०२५ हा दिवस सनातन हिंदुस्थान आणि मातृभूमीला सर्वोपरी मानणाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाचा आणि अंगावर रोमांच आणणारा होता. देशाला स्वातंत्र्य मिळून पाऊणशेहून अधिक वर्षे झाली आहेत. त्या पृष्ठभूमीवर यापूर्वी कधीही साजरा न केला गेलेला उत्सव भारतीय जनमानसाचे प्रतिबिंब असलेल्या पवित्र संसदेत साजरा झाला. निमित्त होते वंदे मातरम् या गीताला १५० वर्षे झाल्याचे. १८७५ मध्ये कवी बंकिमचंद्र चटर्जी यांनी एका भारावलेल्या अवस्थेत वंदे मातरम् हे गीत लिहिले. या गीतात एकूण पाच कडवी आहेत. त्यातील

वंदे मातरम् वंदे मातरम्
सुजलां सुफलां मलयजशीतलाम् सस्य श्यामलां मातरम्, वंदे मातरम्
शुभ्र ज्योत्स्नाम् पुलकित यामिनीम् फुल्ल कुसुमित द्रुमदलशोभिनीम्
सुहासिनी सुमधुर भाषिणीम्, सुखदां वरदां मातरम्
वंदे मातरम्, वंदे मातरम्

हे कडवे स्वतंत्र, प्रजासत्ताक भारताचे राष्ट्रीय गीत म्हणून १९५० साली संसदेत घोषित करण्यात आले. 'जन गण मन' या राष्ट्रगीताच्या समान दर्जा वंदे मातरम् गीताला देण्यात आला. स्वातंत्र्य लढ्याच्या समरात हे गीत गात अनेक ज्ञात-अज्ञात देशभक्तांनी प्राणाचे बलिदान दिले. इंग्रजांचा विरोध आणि बंदी असतानाही देशभरात प्रभात फेऱ्यांमधून हे गीत गायिले जात असे. या गीताच्या माध्यमातून स्वातंत्र्याचा भाव जागृत करण्याचे काम करण्यात आले. वंदे मातरम्चा अर्थ फार सोपा आणि सर्वांना समजणारा आहे. भारतभूची महती या गीतातून सांगण्यात आली आहे.

ख्यातनाम संगीतकार ए. आर. रहमान यांनी वंदे मातरम् या अल्बमच्या माध्यमातून 'वंदे मातरम्... माँ तुझे सलाम' हे गीत गायिले, जे आजही असंख्य राष्ट्रभक्तांच्या ओठी आहे. ए.आर. रहमान यांनी वंदे मातरम्चा अर्थ अगदी सोप्या शब्दात सांगितला होता. १९९७ मध्ये स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झाल्याच्या निमित्त पं. भीमसेन जोशी यांनी तबला, पेटी घेऊन संसदेत वंदे मातरम् हे गीत गायिले होते. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी जवळपास ५० वर्षे या गीताने भारतीयांच्या मनावर अधिराज्य केले. या गीतातील अपार देशभक्तीच्या भावातून प्रेरणा घेत अनेक क्रांतिवीर फासावर गेले. गेल्या शंभर वर्षांत रवींद्रनाथ टागोर ते ए.आर. रहमान यांच्यापर्यंत अनेक संगीतकार, गीतकारांनी या गीताला चाली दिल्या आहेत. १९५१-५२ नंतर केवळ औपचारिकता म्हणून शासकीय पातळीवर या गीताची दखल घेण्यात आली. चीन आणि पाकिस्तानसोबतच्या युद्धाच्या काळात हे गीत वाजविले गेले. याशिवाय औपचारिकता म्हणून दरवर्षी येणाऱ्या स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनाला या गीताचे स्वर कानी पडतात. अन्यथा पूर्वीच्या शासकांनी जणू या समर गीताची उपेक्षाच केली, असे म्हणावे लागेल. पुढे तर या गीताला धर्माशी जोडले गेले. वास्तविक पाहता हे गीत मातृभूमीचे गुणगान करणारे आहे. त्याचा कोणत्याही धर्माशी संबंध नाही. या भूमीचे गुणगान करण्यात कुणालाही हरकत नसावी. पण, दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर देशात धर्माच्या आधारावर असे काही वातावरण तयार करण्यात आले, की वंदे मातरम् हे जणू एखाद्या देवदेवतेची स्तुती अथवा वंदन करणारे गीत असल्याचा समज रुजवला गेला. या भावनेला तत्कालीन सरकारनेही खतपाणी देण्याचे काम केले. वास्तविक पाहता या गीतात या भारतभूला मातेच्या रूपात कल्पित केले आहे एवढेच. दुर्दैवाने काही धर्मांध लोक राष्ट्रप्रेमाच्या ओढीतील मातृ वंदनासारखा थोर भाव ओळखू शकले नाहीत. अशांनी देशापेक्षा धर्माला महत्त्व दिले. एवढी वर्षे उदासीनतेमुळे म्हणा की मरगळ आल्यामुळे म्हणा, बहुसंख्य समाजानेही याकडे दुर्लक्ष केले. पण, परिस्थितीत बदल होतच असतो. २०१४ पासून बहुसंख्यकांसाठी सरकारच्या पातळीवर अनुकूल बदल होण्यास प्रारंभ झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भारतीय जनता पक्षाच्या सरकारने असे काही निर्णय घेतले आहेत, की ज्यामुळे बहुसंख्य समाजात आत्मविश्वास निर्माण होऊन ते आपल्या भावना सार्वजनिकपणे प्रकट करू लागले आहेत.

वंदे मातरम् गीतावर संसदेत चर्चा घडवून आणण्याचा निर्णय हा त्यामुळे साऱ्यांना सुखावणारा ठरला आहे. या गीताची महती ओळखून त्याचे स्मरण करण्यासाठी आणि नव्या-जुन्या पिढीला त्याचे महत्त्व सांगण्यासाठी संसदेत या गीतावर चर्चेचे आयोजन करण्यात आले. ८ डिसेंबरला बरोबर बाराच्या ठोक्याला लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चर्चेला सुरुवात केली. राष्ट्रवादावर मोदींचे भाषण म्हणजे ऐकणाऱ्यांचे मन आणि कान तृप्त झाल्याशिवाय राहत नाहीत. वंदे मातरम्चा इतिहास सांगताना त्यांनी काँग्रेस आणि विरोधकांचे अक्षरशः वाभाडेच काढले. या गीताला विरोध करता करता देशाच्या विभाजनाची बीजे कशी रोवली गेली, हे सांगताना त्यांनी गीताचे तुकडे करण्याबरोबच देशाचे तुकडे होण्यास तत्कालीन काँग्रेस आणि या पक्षाचे नेते कसे कारणीभूत होते हेही सांगितले. मोदींचे भाषण सुरू असताना काँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि डाव्या पक्षांनी गदारोळ करणे सुरू ठेवले. पण, मोदींच्या कोणत्याही मुद्यांचे त्यांच्याकडे उत्तर नव्हते. कारण, मतांसाठी अल्पसंख्यक आणि हिंदुविरोधी मतांवर अवलंबून असलेले लोक खुल्या मनाने वंदे मातरम्चे समर्थनही करू शकत नव्हते. वंदे मातरम्एेवजी ते सरकार कसे चुकीचे करीत आहे यावर बोलून वेळकाढूपणा करीत होते. एरवी अघळपघळ बोलून पक्षाला अडचणीत आणण्यात हातखंडा असलेले राहुल गांधी तर सभागृहातच नव्हते. लोकसभेतील विरोधी पक्षनेता सभागृहात नसणे म्हणजे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याप्रमाणेच आताचे काँग्रेस नेते राहुल गांधी यांचाही वंदे मातरम्ला विरोध आहे की काय, अशी शंका येते. काँग्रेसकडून प्रियांका वढेरा यांनी भाषण केले; पण त्यांनी तर कहर अधिक केला. पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणूक होणार असल्याने संसदेत ही चर्चा घडवून आणली जात असल्याचे सांगत आता वंदे मातरम्वर चर्चा करण्याची गरज काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तुष्टीकरणासाठी काँग्रेस कोणत्या थराला जाऊ शकते, हेच त्यातून दिसून आले. पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये निवडणुका येणे आणि वंदे मातरम्ला दीडशे वर्षे पूर्ण होणे याचा काहीच संबंध नाही. असा योग कृत्रिमपणे जुळवता येत नाही. गीताला ५० वर्षे झाली तेव्हा देश पारतंत्र्यात होता; तर शंभर वर्षे झाली तेव्हा देशात आणिबाणी सुरू होती. लोकशाहीचा गळा घोटण्यात आला होता. आता दशकभरापासून केंद्रात राष्ट्रवादी विचारांचे सरकार सत्तेत असल्याने आज या गीताचे महत्त्व युवा पिढीला समजावून सांगितले जात आहे. त्यात वावगे ते काय?

आपल्या ऐतिहासिक वारशाची हेटाळणी करण्याचे काम काँग्रेस पक्ष करीत आला आहे. मोदी सरकारने राष्ट्रगीतावर संसदेत चर्चा घडवून आणत येणाऱ्या पिढ्यांना वंदे मातरम्चे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने विरोधक याचेही राजकारण करीत आहेत. बंकिमचंद्र चटर्जी यांचे पाचव्या पिढीतील वंशज सजल चटर्जी हे कोलकाता येथील शोभा बाजारात राहतात. स्वातंत्र्यानंतर बंकिमबाबूंची बहुतांश मालमत्ता वारसा म्हणून घोषित करण्यात आली. कोलकाता येथील बंकिमबाबू यांच्या घराचे ग्रंथालयात रूपांतर करण्यात आले. मात्र, त्या घराची आता दुरवस्था झाली असून या ग्रंथालयाच्या आसपास कचरा साचला आहे. हे दृश्य मनाला वेदना देणारे आहे. आज देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जात असताना या गीताचे कर्ते असलेल्या बंकिमबाबूंच्या वंशजांना कुणी विचारायला तयार नाही. आम्ही कसे आहोत याची चौकशीही बंगाल सरकार करीत नाही, अशी खंत सजल चटर्जी यांनी व्यक्त केली. स्वातंत्र्यानंतर बंगालमध्ये १९७७ पर्यंत काँग्रेसची सत्ता होती. त्यानंतर पुढील ३५ वर्षे हा प्रांत डाव्यांच्या हातात होता. २०११ पासून काँग्रेसपासून फुटून वेगळ्या झालेल्या तृणमूल काँग्रेसची सत्ता आहे. डाव्यांचा तर वंदे मातरम्ला विरोध आहेच; पण त्यापूर्वी काँग्रेस सरकारनेही वंदे मातरम् गीताकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. सुदैवाने देशाला नरेंद्र मोदी यांच्या रूपाने एक राष्ट्रवादी विचारांचे पंतप्रधान लाभल्याने वंदे मातरम्चे स्मरण करण्याचे सौभाग्य सर्वांना लाभले आहे. त्याचा आनंद आणि अभिमान प्रत्येक देशभक्ताला वाटेलच.

## विशेष

# राममंदिर बांधणीतील वैज्ञानिक चमत्कार

प्रा. सुखदेव बखळे

अयोध्येतील राम मंदिर हे केवळ श्रद्धेचे प्रतीक नाही, तर आधुनिक अभियांत्रिकी आणि प्राचीन कारागिरीचे मिश्रण आहे, ज्याचा जग येणारी शतकानुशतके अभ्यास करेल. गर्भगृहापासून शिखरापर्यंत, प्रत्येक पायरी, प्रत्येक दगड, प्रत्येक कोरीव काम आणि प्रत्येक शिखरावर एक वैज्ञानिक चमत्कार लपलेला आहे जो जगाला आश्चर्यचकित करतो. गर्भगृहापासून शिखरापर्यंत राममंदिर जितके भव्य आहे, तितकाच तो चमत्कार आहे. प्रत्येक कणात विज्ञान आहे. धार्मिक ध्वज फडकवल्यानंतर राम जन्मभूमी मंदिर अखेर पूर्ण झाले आणि लोकांनी त्यासाठी झालेल्या चळवळीबद्दल, त्यानिमित्ताने झालेल्या राजकारणाबद्दल, रामाच्या कथा आणि श्रद्धेबद्दल खूप चर्चा केली. चर्चा झाली, गाणी गायली गेली आणि आनंद व्यक्त केला गेला; पण आणखी एक मुद्दा सर्व भारतीयांना आणि जगभरातील लोकांना माहीत हवा की, धर्म आणि श्रद्धा यांचे स्थान आहे; पण त्याची वास्तुकला, वास्तुशास्त्र, त्याची रचना; प्रत्येक गोष्ट खरोखर समजून घेणे आणि अभ्यासणे आवश्यक आहे. जगभरातील आघाडीचे नागरी आणि संरचनात्मक अभियांत्रिकी आणि वास्तुकला तज्ज्ञ याचा अभ्यास करत आहेत आणि शतकानुशतके ते करत राहतील. अयोध्येतील भव्य राम मंदिराच्या शिखरावर १९१ फूट उंच भगवा ध्वज फडकला आहे. सामान्य लोक मंदिराला फक्त श्रद्धेचे प्रतीक मानतात; परंतु त्यामागील वैज्ञानिक विचारसरणीचाही विचार करणे आवश्यक आहे.

उत्तर भारतात मंदिराच्या रचनेची एक प्राचीन शैली आहे, तिला नागर शैली म्हणतात. हे मंदिरदेखील नागर शैलीत बांधले गेले आहे. नागर शैलीतील मंदिराचे शिखर खूप उंच आणि टोकदार आहे. आपण वर जाताना, शिखर टोकदार बनते आणि शिखराच्या वरच्या बाजूला अमलक नावाचा एक गोल दगड असतो. त्यावर एक कलश ठेवला जातो. प्राचीन काळात, हा कलश सोन्याचा किंवा चांदीचा बनवला जात असे. राम मंदिराच्या प्रत्येक शिखरावर एकच गोष्ट आहे, एक गोल दगड आणि एक कलश. धर्मध्वजदेखील सर्वांत उंच शिखरावर उभारण्यात आला आहे. म्हणून, नागर शैली त्याच्या शिखरावरून ओळखली जाते. नागर शैलीचा दुसरा मुख्य मुद्दा म्हणजे गर्भगृह चौकोनी आहे. दक्षिण भारतातील मंदिरे पाहिली असतील, तर गर्भगृह आयताकृती आहे आणि नागर शैलीमध्ये ते चौकोनी आहे. त्याचप्रमाणे, राम मंदिरातील गर्भगृह चौकोनी आहे. नागर शैलीत मंदिर जमिनीपासून उंचावर, म्हणजेच एका व्यासपीठावर बांधले आहे. यामुळे मंदिर केवळ दुरूनच दिसत नाही, तर पुराच्या पाण्यापासूनही दूर राहते. अयोध्या शहर शरयू नदीकाठी वसले आहे. आज पुराचा धोका नसला, तरी मंदिर एक हजार वर्षे टिकेल असे बांधले गेले आहे. राम मंदिर परिसरात अनेक लहान शिखरे आहेत. गर्भगृहाचे शिखर खूप उंच आहे; परंतु भाविक जिथे उभे असतात, त्या समोरील मंडप त्याच्या अर्ध्या उंचीचा आहे. राम मंदिरातील नृत्य मंडप आणि रंग मंडप सर्व सारखेच आहेत. नागरा



शैलीमध्ये गर्भगृहाच्या आतील छतावर फिरत्या फुलांसारख्या डिझाईन आहेत. त्यांना 'कुंड' किंवा 'पद्म' म्हणतात. वास्तुशास्त्रानुसार, मंदिराचे तोंड पूर्वेकडे आहे. त्यामुळे सूर्योदयाच्या वेळी सूर्याची किरणे थेट मंदिरावर पडतात. सूर्योदयाच्या वेळी वर्षभर सूर्याची स्थिती बदलते, पण मंदिर बदलणार नाही. म्हणून, रामजन्मभूमी मंदिराची रचना अशा प्रकारे करण्यात आली आहे, की रामनवमीच्या दिवशी सूर्याची किरणे थेट रामलल्लावर पडतील. मंदिराची दिशा बारकाईने मोजणी करून निश्चित करण्यात आली. नागर शैली ही गुप्त काळातील पाचव्या शतकातील आहे. राम मंदिराचे मुख्य शिखर १२८ फूट उंच आहे आणि तीन मोठे शिखर आहेत. संपूर्ण मंदिर ३६० फूट लांब, २३५ फूट रुंद आणि १६१ फूट उंच आहे. त्यात तीन मजले आहेत. प्रत्येकी २० फूट उंच. त्यात ३९२ खांब आणि ४४ दरवाजे आहेत. प्रत्येक खांब आणि भिंतीवर देवता, फुले, प्राणी आणि रामायणातील कथा कोरलेल्या आहेत. मंदिराची रचना १५ पिढ्यांपासून मंदिर बांधकामात तज्ज्ञ असलेल्या सोमपुरा कुटुंबाने केली. चंद्रकांत सोमपुरा यांनी १९८८ मध्ये पहिली रचना तयार केली. त्यांच्या मुलांनी २०२० मध्ये ती अद्ययावत केली. मंदिराची मांडणी पृथ्वी, पाणी, अग्नी वायू आणि आकाश या पाच घटकांवर आधारित आहे. मंदिराचा ईशान्य कोपरा हवा आणि पाण्याच्या प्रवाहासाठी खुला ठेवला आहे. याचे केवळ आध्यात्मिक परिणाम नाहीत, तर अभियांत्रिकी दृष्टिकोनातूनही पुराचा धोका कमी होतो. नागर शैलीसोबतच मंदिरात दक्षिण भारतातील द्रविड शैलीचे घटकदेखील समाविष्ट आहेत. जसे की, रामेश्वरम आणि तिरुपतीच्या मंदिरांपासून प्रेरित कोरीवकाम.

प्रभू राम संपूर्ण भारतीय उपखंडाचे प्रतिनिधित्व करत असल्याने डिझाईन संपूर्ण भारतीय आहे. ही रचना तयार करण्यासाठी प्रगत 'बीआयएम' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. 'बीआयएम' म्हणजे 'बिल्डिंग इन्फॉर्मेशन मॉडेलिंग'. याचा अर्थ बांधकामापूर्वी एक थ्रीडी मॉडेल तयार करण्यात आले होते. संपूर्ण मंदिर तयार केले गेले आणि संगणकावर सत्यापित केले गेले. प्रत्येक दगडाची जागा पूर्वनिर्धारित होती. बांधकामात लोखंड किंवा स्टीलचा वापर केला गेला नाही. कारण लोखंडाचे आयुष्य फक्त ८०-९० वर्षे असते. ते ओलाव्यामुळे गंजू शकते. राममंदिर एक हजार वर्षे टिकेल, असे डिझाईन केले आहे. म्हणूनच मंदिरासाठी खास दगड निवडण्यात आले. मुख्य दगड राजस्थानमधील बन्सी पहाडपूर येथून आले होते. त्यांना गुलाबी वाळूचा खडक म्हणतात. त्यात वाळूचे ३२ हजार आठशे खडक आहेत. प्रत्येकाचे वजन दोन टन आहे. त्यांच्या खाली २०,७०० मोठे ग्रॅनाईट ब्लॉक आहेत, जे दक्षिण भारतातून आले होते. वाळूच्या खडकात खूप जास्त दाब असतो. म्हणजे, तो इतर दगडांपेक्षा जास्त दाब सहन करू शकतो. भूकंपाच्या वेळी हा दगड धातूपेक्षा अधिक लवचीक ठरतो, कारण तो कंपन शोषून घेतो. म्हणूनच तो निवडण्यात आला. याव्यतिरिक्त 'राम शिला' आहेत. त्यावर 'श्री राम' असे लिहिलेल्या विशेष विटा. त्या चुना आणि मातीपासून बनवल्या आहेत. त्या मजबूत असतात. पण खास गोष्ट म्हणजे दगड जोडण्यासाठी सिमेंटचा वापर करण्यात आला नाही. दगडांना जोडण्यासाठी 'कुलूप आणि चावी' तंत्राचा वापर करण्यात आला. भूकंपाच्या वेळी दगड एकमेकांशी जोडलेले असतात; जेणेकरून ते वेगळे होणार नाहीत. सांधे कधीही तुटणार नाहीत, कारण दगड एकमेकांशी जोडलेले असतात. ही तंत्रेदेखील आपल्या प्राचीन वास्तुकलेतून आली आहेत; परंतु आधुनिक अभियांत्रिकीद्वारे परिपूर्ण केली गेली आहेत. यामुळे संपूर्ण रचना दगडासारखी मजबूत होते. मंदिर शरयू नदीजवळ असल्याने पाण्याची पातळी उंच आहे आणि मातीचा वरचा भाग चिकणमाती आहे. अशा मातीवर जड संरचना अस्थिर असू शकतात. आयआयटी चेन्नईच्या तज्ज्ञांनी १५ मीटर खोलीपर्यंत खोदण्याची शिफारस केली. त्यानुसार, एक लाख ३२,२१९ घनमीटर मातीचे उत्खनन करण्यात आले. त्यानंतर एक कृत्रिम पाया बांधण्यात आला. रोलर-कॉम्पॅक्टेड काँक्रीटचा १४-१५ मीटर जाडीचा थर म्हणजेच १४-१५ मीटर आरसीसी पाया तयार करण्यात आला. हा काँक्रीटचा थर आहे जो फ्लाय अॅश, चिकणमाती आणि रसायनांपासून बनवला जातो. तो रोलरने दाबून कडक करण्यात आला. काँक्रीटचे चौपन्न ते छप्पन्न थर पायावर लावण्यात आले. त्याची संकुचित शक्ती ६० एन/मिमीपेक्षा जास्त आहे, म्हणजेच ते प्रति चौरस मिलिमीटर ६० किलोग्रॅम वजन सहन करू शकते. या पायावर २१ फूट जाडीचा ग्रॅनाईट प्लिंथ ठेवण्यात आला आहे, जो त्याला आर्द्रतेपासून वाचवतो. याचा अर्थ हा पाया एक हजार वर्षे टिकू शकतो. आणि तो मंदिराच्या लाखो टनांचे वजन सहजपणे सहन करेल. राम मंदिराची सर्वांत मोठी वैज्ञानिक कामगिरी म्हणजे आठ रिश्टर स्केलच्या भूकंपांना तोंड देण्याची क्षमता. एका अंदाजानुसार या भागात दर २५०० वर्षांनी एकदा ८ रिश्टर स्केलचा भूकंप होतो. तसा तो झाला तरी मंदिराला कोणतीही हानी पोहोचणार नाही.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# आठ दशकांची लगबग थांबली!

श्रमिक आणि असंघटितांच्या हक्कांसाठी लढणाऱ्यांच्या मांदियाळीत अनेक जण आपल्यास त्यांच्या कर्तृत्वाने खुणावून जातात. पण कायम स्मरणात राहणारे काही मोजकेच! महाराष्ट्राच्या श्रमिक चळवळीचे आधारस्तंभ म्हणून ज्यांनी स्वतःला सिद्ध केले असे डॉ. बाबा आढाव यांचे जाणे असंघटित कामगारांचे पितृछत्र हरपल्यासारखे आहे. ८० वर्षे कष्टकऱ्यांसाठी दिलेला लढा आणि त्यातील एक एक आंदोलन बाबांच्या संघटन सामर्थ्याची ओळख देते.

कामगारांचे अनेक नेते महाराष्ट्राला लाभले. कामगारांच्या भल्यासाठी रस्त्यावर उतरून रान पेटविणारे महाराष्ट्राने पाहिले पण जिद्द, चिकाटी आणि सचोटीने लढा देत श्रमिक, असंघटित, शोषितांना शेवटच्या क्षणापर्यंत जपणारे म्हणून डॉ. बाबा आढाव हे नक्कीच स्मरणात राहतील. सुमारे ८० वर्षांची कारकीर्द त्यांनी आपल्या संघटनकौशल्य, ताठरबाणा आणि असंघटितांच्या न्याय्य हक्कासाठी घालविली. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि श्रमिक चळवळीचे आधारस्तंभ म्हणून उदयास आलेल्या बाबा आढाव यांनी गांधीजींच्या चले जाव आंदोलनातून सामाजिक कार्याला सुरुवात केली. त्यावेळी ते शालेय जीवन जगत होते. वैद्यकीय शिक्षण घेत, वैद्यकीय सेवा काही काळ दिल्यानंतर असंघटित कामगारांचे दुःख त्यांना अस्वस्थ करू लागले आणि तेथूनच त्यांच्या नेतृत्वाने वेगळे वळण घेतले. असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि निवृत्ती वेतन मिळावे हा त्यांचा आग्रह होता आणि याच धर्तीवर त्यांचा कामगार नेते म्हणून प्रवास सुरू झाला. त्यांच्यात असलेल्या प्रतिभेच्या जोरावर शांततेच्या मार्गाने अनेक आंदोलने यशस्वी करीत त्यांनी कष्टकऱ्यांना न्याय दिला. शांततेच्या मार्गाने केलेल्या आंदोलनातून व्यवस्थेला झुकविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. असंख्य असंघटित कामगारांचे संघटन करून त्यांना एकसंध ठेवीत त्यांच्यासाठी लढण्याची प्रतिभा वेळोवेळी त्यांच्या आंदोलनातून दिसून आली. म्हणून असंघटित श्रमिकांचे पिता म्हणूनही त्यांनी आपली ओळख निर्माण केली होती.

सरकार, सत्ता याचा जराही परिणाम त्यांच्यावर होत नसे! म्हणूनच तर धरणग्रस्तांसाठी यशवंतराव चव्हाण यांच्या विरोधात तर पाठ्यपुस्तकात साईबाबांचे धडे येऊ नये म्हणून शंकरराव चव्हाण यांच्या विरोधात आंदोलन करण्याचे धाडस त्यांनी दाखविले. यशवंतराव चव्हाण ते शंकरराव चव्हाण अशा दोन्ही मुख्यमंत्र्यांच्या कालखंडात संघर्षाचा विस्तृत पट लिहिण्याचे काम त्यांनी केले.

कामगारांचे हक्क हा बाबांचा प्राण होता. म्हणूनच तर त्यांनी असंघटित असलेल्या हमालांना एकत्रित आणून 'हमाल पंचायत'ची स्थापना केली. जातीय भेदाभेदाच्या विरोधात लढ देताना 'एक गाव एक पाणवठा' ही क्रांतिकारी चळवळ उभी करणारे बाबा कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी लढतानाच समाजातील अस्पृश्यता दूर करण्यासाठीही धडपडताना दिसले. केवळ एकाच ध्येयाने प्रेरित होऊन काम न करता, समाजातील बोचऱ्या प्रथाही बाबांनी मोडीत काढण्यासाठी पुढाकार घेत समाजभान जपण्याचे काम केले. ज्यावेळी निळूभाऊ लिमये, जॉर्ज फर्नांडिस, सदाशिव बागाईतकर, इंदूताई केळकर, मृणाल गोरे ही कामगार चळवळीतील मंडळी आपापल्या कामाने क्षितिजावर चमकत होती, त्यावेळी बाबा आढाव नावाचा ताराही आपल्या संघटनकौशल्याच्या जोरावर लक्षेवधी ठरीत होता.

विधायक आणि रचनात्मक कामांचा मापदंड निर्माण करताना, त्यांनी ध्येयवादी कार्यकर्त्यांची फळी घडविली. सरकारी पुरस्कार म्हणजे सरकारी बेडी म्हणून महाराष्ट्र भूषण पुरस्कार नाकारताना मला कष्टकऱ्यांशी असलेले नातेच अबाधित ठेवायचे आहे असे सांगणारे बाबा किती निःस्वार्थी लढले असतील, याची कल्पना येते. अख्खी हयात ज्यांनी रस्त्यावरील मोर्चे आणि आंदोलनाच्या माध्यमातून असंघटितांसाठी लढा दिला, त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत आंदोलने केली. मतदान यंत्रणाच्या विरोधातही रस्त्यावर उतरून आवाज उठविणारे बाबाच होते! ५३ हून अधिक वेळा तरुंगवास भोगूनही कायम लढण्यासाठी सज्ज राहणारे बाबा आढाव यांचे जाणे असंख्य असंघटितांना पोरके करून गेले. कष्टकरी जगाला आठ दशके ज्यांनी लगबगीची सवय लावली, ती आता थांबली! हक्क आणि सामाजिक सुरक्षेसाठी समर्पित एका ध्येयनिष्ठ नेतृत्वाला महाराष्ट्र पोरका झाला.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# मत्स्यपुराण

प्रा. दिलीप जोशी

अठरा पुराणांतील भगवान विष्णूंचा प्रथम अवतार ज्या पुराणात वर्णन केलेला आहे त्या पुराणाला मत्स्यपुराण म्हणतात. वास्तविकतः मत्स्य म्हणजे मासा. माशाचे जीवन पाण्यात मर्यादित असते. मासा सामान्य अर्थानी कमजोर प्राणी आहे. पण तरीही भगवान विष्णूंनी आद्यावतार म्हणून मत्स्यावतार धारण केला. हाच अवतार सजीव सृष्टीच्या बीजरक्षणाचेही कारण ठरला. या अवताराचेही प्रयोजन महत्त्वाचे आहे.

भगवान ब्रह्मदेव योगनिद्रेत असताना त्यांच्या मुखातील वेद हयग्रीव नावाच्या दैत्याने योगबलाने ग्रहण केले आणि तो पाताळात निघून गेला.(हयग्रीव दोन आहेत. एक हा दैत्य आणि दुसरे हयग्रीव रूपातील भगवान विष्णू. या कथेतील हयग्रीव दैत्य आहे.)

त्याच वेळी प्रलयकाळ जवळ येत होता. प्रलयानंतर पुन्हा सृष्टी रचण्यासाठी ब्रह्मदेव वेदाचे साहाय्य घेत असतात. वेद हयग्रीव दैत्याने पाताळात नेले. वेद नसतील तर सृष्टीची पुनर्रचना कशी करावी? हा प्रश्न सर्वांसमोर होता. त्यामुळे भगवंताच्या अवताराचे प्रयोजन ठरले. हयग्रीव राक्षसाचा वध करून वेद रक्षण करणे.

त्याकाळात सत्यव्रत नावाचे राजर्षी होते. (पुढे ते वैवस्वत मनु म्हणून प्रसिद्ध झाले) ते सत्यव्रत कृतमाला नदीवर स्नान संध्या तर्पण करीत असताना त्यांच्या ओंजळीत एक छोटीशी मासळी आली आणि ती मनुष्याप्रमाणे राजे सत्यव्रत यांना आर्जव करू लागली की, हे राजन! मला मोठ्या माशांपासून वाचवा.

सत्यव्रत राजर्षींनी त्या मासळीला कमंडलूत टाकले आणि आश्रमात आणले. तिला अनुक्रमे माठात, विहिरीत, सरोवरात, नदीत टाकले पण प्रत्येक ठिकाणी ती मोठी मोठी होत त्या त्या ठिकाणी मावेनाशी झाली. अखेर सत्यव्रतांनी तिला समुद्रात टाकले. तिथेही ती इतकी प्रचंड मोठी झाली की समुद्रातही मावेना. आता सत्यव्रत राजे तिला शरण जाऊन आपण कोण आहात, असे विचारते झाले. आता त्या मासेळीने भगवान विष्णुरूपात राजांना दर्शन दिले आणि सांगितले की, हयग्रीव नावाच्या दैत्याने वेद पाताळात पळवून नेले आहेत आणि इथे तर आजपासून सातव्या दिवशी प्रलय येणार आहे. सर्व पृथ्वी जलमय होणार आहे. सर्व जीवसृष्टी समूळ नष्ट होणार आहे. त्या स्थितीत जीवसृष्टी कायम राहावी म्हणून वेद आवश्यक आहेत. वेद पाताळात हयग्रीव दैत्याजवळ आहेत.

वेद परत येईपर्यंत तुला एक कार्य करायचे आहे. हे सर्व जग जेव्हा पाण्यात डुंबून जाईल तेव्हा हे सत्यव्रत राजर्षी, मी एक प्रचंड नौका पाठवेल. त्या नौकेत सप्तर्षींसह जीवांश या नौकेत घेऊन आपण बसा. वासुकी नागराजांना पाचारण करा. मी मत्स्यरूपात हयग्रीव दैत्याला परास्त करून तुमच्या रक्षणासाठी येईल. मला एक शृंग म्हणजे शिंग असेल. त्या शिंगाला तुम्ही नागराज वासुकीचे मुखाने बांधा आणि त्यांची शेपूट नौकेला बांधा. प्रलयातून मी तुम्हाला सुखरूप बाहेर काढेन, तुमचे रक्षण करेन. दरम्यानच्या काळात प्रलय संपेपर्यंत मी तुम्हाला गुह्यज्ञान देखील सांगेल. त्यानंतर प्रलय थांबताच नूतन सृष्टी निर्माण करू.

पुढे तसेच घडले. मत्स्य भगवंतांनी हयग्रीवाचा वध केला. प्रलयकाळात नौकेला वाचविले. नंतर प्रलय ओसरल्यावर नौका काठाला सुखरूप लावून सर्वांना वाचविले आणि पुन्हा सृष्टीची रचना सत्यव्रत म्हणजे वैवस्वत मनु यांच्या साहाय्याने केली. अशी मत्स्यपुराणाची मूळ कथा आहे.

''पुराणातील वांगी पुराणात'' अशी म्हण उपहास किंवा उपरोधाने आपण नेहमी वापरतो. पण ती वांगी नसून पुराणातील वानगी आहे. त्याचा सकारात्मक अर्थ घेतला तर पुराणात जे आहे ते इतर कोणत्याही साहित्यात क्वचितच मिळण्याची शक्यता आहे. मत्स्यपुराणाचा विचार केला तर १४००० श्लोक संख्या असलेल्या या पुराणात २९१ विषयांचा विचार केला आहे. विशेष म्हणजे त्यातील बहुतांश विषय आजच्या काळातही उपयुक्त आहेत. ग्रहांच्या हालचाली, त्याचे जीवसृष्टीवर होणारे इष्ट आणि अनिष्ट परिणाम. हे विज्ञानाच्या कसोटीवर आजही सिद्ध आहे.

आयुर्मान वाढविण्यासाठी विविध उपाय, राजधर्म, शासन व्यवस्था, साहित्यिक दृष्टिकोन, शासकीय कर्मचाऱ्यांची निवड करतानाची मापदंडे अशी अनेक प्रकरणे मत्स्यपुराणात आहेत. ती आताही लागू पडतात. मत्स्यपुराणातील राजधर्म तर राज्याच्या सीमा, राजाची कर्तव्ये, प्रजापालन, भौतिक सुविधा, सरंक्षण विचार, किल्ल्यांचे प्रकार याचा विचार करतो. राजाने कावळ्यासारखे सावध आणि शंकायुक्त राहावे. राजाने कुठे खावे, झोपताना कोणती काळजी घ्यावी, स्नान करताना आधी तलावाचे परीक्षण या सर्व संरक्षणात्मक बाबी आजच्या काळातही महत्त्वाच्या आहेत.

याशिवाय विविध धार्मिक विधी, मंदिरे ही सामाजिक स्वास्थ्याची केंद्रे आहेत. त्यामुळे त्याचे वास्तुशास्त्र, विविध संस्कार यांचाही विचार आहे. मयासूर हा त्यावेळीचा स्थापत्य पारंगत त्याचा उल्लेख इथे आहे. आजकाल इंटीरियर डेकोरेशनच्या अभियंत्यांनी या पुराणात शिरून भर टाकण्याची गरज आहे. ते मत्स्यपुराणात आहे.

संसार आनंदी असावा म्हणून पतीचा धर्म, पतिव्रतेचा धर्म, पुरुषार्थ म्हणजे काय हा विचारही याच पुराणात सांगितला आहे. गृहनिर्माण, वास्तुकला, मूर्तिकला, चित्रकला, स्वप्नशास्त्र, रत्नविज्ञान या सर्वांबाबत चिंतन मत्स्यपुराणात आहे. मत्स्यपुराणातील काही प्रकरणे मत्स्यपुराणाचा परिचय करून देतात. जसे या पुराणात मत्स्यावतार कशासाठी यावर प्रकरण आहे. त्यात बीजरक्षणाचा विचार आहे. मत्स्यभगवान आणि मनु यांचा ज्ञानयोग संवाद आहे. सृष्टी प्रकरणात जीवसृष्टीचा विचार आहे. सरस्वती चरित्र, कश्यपान्वय, पृथु आणि त्यावरून पृथ्वी वर्णन आहे. मनुवरून मन्वंतर ही कालगणना, मनुचे पुत्र, आदित्य आख्यान, देवीची १०८ नावे याचा समावेश मत्स्यपुराणात आहे. थोडक्यात, या पुराणात भारतीय मूल्ये, भारतीय भूगोलाचे सौंदर्य, भारतीय वातावरण, निसर्ग वर्णन दिले आहे. इथेच व्रत, पर्व, तीर्थ आणि विविध भारतीय वंशाचा विचार आहे. याच पुराणात बीजरक्षणाचे विज्ञान मांडले आहे. पर्यावरण, राजव्यवस्था, साहित्य, कला आणि संस्कृती यांचा अनोखा संगम म्हणजे मत्स्यपुराण होय.


अठरा पुराणे ही आपल्या भारतीय हिंदू संस्कृतीचा वसा आहेत. यात आपली जीवनमूल्ये, आपली सनातन संस्कृती, आपला उदार हेतू दिलेला आहे. पुराण अभ्यासणारा हा अध्यात्म विज्ञानाचा पुरस्कर्ता ठरेल. पुराणांकडे हीन दृष्टीने पाहणारे चूक करताहेत असे माझे मत आहे. पुराणातील वांगी म्हणणारांनी पुराणातील वानगी तपासा मग आपोआप पुराणांचे महत्त्व सर्वांना कळेल. मत्स्यपुराण हे त्यासाठी महत्त्वाचे वाङ्मय ठरेल.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### ध्यान-धारणेने मनस्वी शांती

व्यक्ती जीवनातील ध्यान-धारणांवर मानवी मनांची स्थिरता अवलंबून असते. आज मानवी जीवन मोठ्या प्रमाणात अस्थिर आहे. सामाजिक, कौटुंबिक, भौतिक, भौगोलिक परिस्थिती व सभोवतालचे वातावरण मोठ्या प्रमाणात गढूळ व असमंजपणाचे, अविचारीपणाचे व अस्थिरतेचे आहे. या विपरीत परिस्थितीत मन स्थिर व संयमी ठेवण्यासाठी ध्यान-धारणेशिवाय पर्याय नाही. या गढूळ वातावरणामुळे व्यक्तीच्या मानसिकतेवर व आरोग्यावरही मोठ मोठे आघात होऊन विपरीत परिणाम होत आहेत. ही परिस्थिती थांबण्याचे नाव घेत नाही. दिवसेंदिवस नवनवीन समस्या व



अडचणी निर्माण होतात व व्यक्तीचे जीवन आणखी अस्थिर व अस्वस्थ होत आहे. या स्थितीमुळे अनपेक्षित घटना घडत आहेत. हे सर्व संयम, सामंजस्यने पार पडावे असे वाटत असल्यास समाजातील प्रत्येकाने आपल्या वेळेतील काही तास ध्यान-धारणेसाठी दिला तर या बाबींतून सहज मार्ग निघेल. ध्यान-धारणा नियमित काही मिनिटे केल्यास मन हलके होईल. मनाचे जडत्व निघून जाईल, मनातील अस्वस्थपणा हळूहळू दूर होईल. मनातील नकारात्मक विचार हळूहळू कमी होतील व मन प्रसन्न, उल्हसित व ताजे -तवाने होईल. मन सकारात्मक होईल व जीवन आनंदी. उत्साही जीवन जगण्याची उमेद मनामनात निर्माण होईल.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

●● ●●

### अन्न हे पूर्णब्रह्म... त्याची नासाडी टाळा

संयुक्त राष्ट्राच्या एका अहवालानुसार जगात जवळपास दरवर्षी मोठ्या प्रमाणात अन्नाची नासाडी होते. ही आकडेवारी २०२२ मधील शाळांतली आहे. आज यात वाढच झाली असणार . भारतात अन्न सुमारे ८७ लाख टन अन्न वाया जाते. आज अनेक शहरांत रस्त्यावर राहिलेल्या अन्नाचे ढीग लागलेले असतात. हे अन्न शेवटी कचऱ्यात जाते. एका बाजूला लोक अन्नाअभावी दिवस काढत आहेत तर दुसऱ्या बाजूला हे अन्न टनांनी कचऱ्यात जात आहे. अनेक हॉटेल्स, खानावळी यामधून सुद्धा दररोज अन्न वाया जाते. लग्नाच्या मंडपात तर याचे प्रमाण खूपच आहे. हे आपण वाचवू शकणार नाही का? या बाबतीत लोकांनीच निर्धार केला पाहिजे. हॉटेलमध्ये अन्न टाकू नका अशा स्वरूपाचे बोर्ड लावले पाहिजेत. प्रसंगी अशा लोकांवर दंडाची कारवाई करणे गरजेचे आहे. आज भारताची लोकसंख्या वाढत आहे. जमीन मात्र आहे तेवढीच आहे. किंबहुना ती काही प्रमाणात विविध कारणांनी कमी होत आहे. त्यामुळे भविष्य काळात अन्नटंचाईचे स्वरूप भीषण होणार यात काही शंका नाही. दुसरी एक बाब म्हणजे शिजवलेले तब्बल ३० टक्के अन्न थेट कचऱ्यात जाते. ही बातमी नुकतीच वाचण्यात आली उत्तर अमेरिका खंडात २३ टक्के, युरोपमध्ये १३ टक्के, आशिया खंडात १४ टक्के, लॅटिन अमेरिका व कॅरिबियन यामध्ये ६ टक्के. एवढी प्रत्येक खंडातली शिजविलेल्या अन्नातली वाया जाणारी टक्केवारी आहे. एकूणच जगभर ही अन्नाची अवस्था आहे. दरवर्षी १६ ऑक्टोबर हा दिवस अन्नटंचाई दिवस पाळला जातो. या दिवशी अन्न टाकू नये व त्याची नासाडी टाळावी या दृष्टीने प्रबोधन केले जाते. राज्य व केंद्र सरकारने सुद्धा यात लक्ष घालून अन्न कसे वाचविता येईल हे पाहिले पाहिजे. हे काम सर्वांचे आहे हे विसरता कामा नये.

**शांताराम वाघ**/पुणे

●● ●●

## आजचे संघगीत-६८

बुधवार, १० डिसेंबर २०२५

### विश्वासाने सदैव गगनी ध्वज भगवा नाचे

विश्वासाने सदैव गगनी ध्वज भगवा नाचे ॥धृ.॥

कंकण सत्कार्याचे बांधुन युगायुगांचे फेडू या ऋण ।
होते ते दृढ तुटले बंधन जाचक सत्तेचे ॥१॥

समस्या न परि सरल्या अजुनी भरल्या वाटा या काट्यांनी ।
धैर्ये टाकू सर्व मिळोनी पाउल या पुढचे ॥२॥

शब्द मोजके कृती प्रभावी काल सुमंगल घडविल भावी ।
त्यागाविण का तसेच जीवन कधि विलसायाचे? ॥३॥

उत्कर्षाचा ध्यास धरोनी प्रतिपच्चंद्र जसा ये गगनी ।
तसेच जीवन आकांक्षांनी भरु एकेकाचे ॥४॥

अजिंक्य व्हावा अखंड भारत मूर्त करू हे थोर मनोरथ ।
विश्वासाने सदैव गगनी ध्वज अपुला नाचे ॥५॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### राष्ट्रीय महामार्गा प्रशासन बेखबर



**मानवत,/प्रतिनिधी :** मानवत शहर हे जूनी व्यापार पेठ असून हे शहर कापसावर प्रक्रिया करणारे शहर असल्यामुळे मानवत शहर व रूढी ग्राम पंचायतीच्या कार्यक्षेत्रात कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग धंदे निर्माण झाले असून शहराच्या आस पास आठ दहा जिनिंग प्रेसिंग असलेल्या जिनिंग निर्माण झाल्याने परप्रांतिय कामगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे.

त्याच बरोबर पांढरे सोने पिकविणारा जिल्हा म्हणून महाराष्ट्राच्या नकाशावर परभणी जिल्हाला स्थान मिळाले आहे. मानवत हे शहर अतिशय जूनी व्यापार असल्याने शेतकऱ्यांच्या मालाला नगदी दाम या व्यापार पेठेत मिळत असल्याने कापसाची आवक मोठ्या प्रमाणात वाढली पण जिनिंग मालकांनी पार्किंगची व्यवस्था नसल्यामुळे राष्ट्रिय महामार्गावर वाहनांचा मोठा ताफा दोन्ही बाजूने उभा रहात असल्यामुळे व काही व्यावसायीक खरेदीदारांची खरेदी हे राष्ट्रिय महामार्गावर निर्माण करण्यात आलेल्या जिनिंग प्रेसिंग मध्ये खरेदी करण्यात येत असल्यामुळे भविष्यात भरधाव धावणाऱ्या वाहना मुळे अपघात होण्याचे संकेत जाणकार व्यक्त करीत असून मात्र या मार्गावर उभी राहत असलेल्या वाहनाची खबदारी घेण्यात येत नसल्यामुळे महामार्ग प्रशासन मात्र डोळे मिटून कूंभकर्णी झोपेत असल्याचे सोंग करीत असल्यामुळे प्रशासना विषयी संताप व्यक्त केल्या जात आहे.

### ज्ञानसाधनेत दिव्यांगांचा आधार समाजाचा अभिमानसमुपदेशन कार्यक्रम



**परभणी,/प्रतिनिधी-** धर्मापुरी पाटी परभणी ८ डिसेंबर २०२५ ज्ञानसाधना प्रतिष्ठान अंतर्गत रायरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच ज्ञानसाधना फाउंडेशन द्वारा आयोजित दिव्यांगाचा आधार समाजाचा अभिमान हा सौ.दिक्षा ताई दिंडे समुपदेशनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्ञानसाधना प्रतिष्ठानचे मा.श्री. शिवसांभदादा सोनटक्के राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी व समुपदेशिका च्या सौ. दिक्षा ताई दिंडे व श्री.अमोल सुतार सर उपस्थित होते. याप्रसंगी सर्वप्रथम क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभ हस्ते झाले.नंतर ज्ञानसाधना सुरसागर गीत संच यांनी स्वागत गीत सादर केले याप्रसंगी सौ दीक्षा ताई यांनी अपंगत्व या समाजातील संवेदनशील विषयावर विद्यार्थ्यांसोबत सुंदर असा संवाद साधला .समाजात अपंग लोकांसोबत कसे राहावे ,कसे वागावे याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले.तसेच भविष्यात अपंग व्यक्तीसाठी अनेकविध सुविधा निर्माण करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.शिवसांभ दादा यांनी अध्यक्षीय समारोपात समाजात अपंग व्यक्ती सोबत सर्वसमावेशक पद्धतीने वागण्यासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी फाउंडेशन वर्ग ६ ते १० चे समन्वयक श्री.आर.जी.पोले सर व ,महिला वसतिगृह समन्वयिका अश्विनी घोगरे मॅंडम तसेच विभाग प्रमुख श्री परडे एस.आर.सर श्री.पवार व्ही.बी सर. सौ महिपाल पी.व्ही. मॅडम,श्री. जोशी सर,नईम सर आदींची उपस्थिती होती फाउंडेशनचे वर्ग सहावी ते दहावी व सेमी विभागाचे वर्ग सहावी ते आठवी चे विद्यार्थी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. पत्की एन .वाय. यांनी तर आभार समन्वयक श्री.आर.जी पोले सर यांनी मानले. कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

### हैद्राबाद-लोकमान्य टिळक टर्मिनस-हैद्राबाद विशेष गाडी धावणार

**परभणी,/प्रतिनिधी-** प्रवाशांची वाढती गर्दी आणि मागणी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेतर्फे हैदराबाद-लोकमान्य टिळक टर्मिनस-हैदराबाद या मार्गावर विशेष गाडी चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही विशेष सेवा नांदेड व छत्रपती संभाजीनगर मार्गे संचलित केली जाणार असून प्रवाशांच्या सोयीसाठी दिलेल्या दिनांकांना एक फेरी पूर्ण करेल. गाडी क्रमांक ०७१५० हैदराबाद-लोकमान्य टिळक टर्मिनस ही विशेष गाडी शनिवार दि. ०६ डिसेंबर रोजी सुटेल, तर गाडी क्रमांक ०७१५१ लोकमान्य टिळक टर्मिनस-हैदराबाद ही गाडी रविवार ०७ डिसेंबर रोजी प्रस्थान करेल. दक्षिण मध्य रेल्वेच्या या निर्णयामुळे वाढत्या प्रवासी संख्येला दिलासा मिळणार असून या मार्गावरील गर्दीही कमी होण्यास मदत होणार आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# क्रोध, मत्सर, चिंता, ताण हे नरकाचे दरवाजे- राष्ट्रसंत ललितप्रभात

**रामप्रसाद कंठाळे**
**जितूर,/प्रतिनिधी-** राष्ट्रसंत महोपाध्याय श्री ललितप्रभ सागरजी महाराज यांनी सांगितले की जीवन अत्यंत मौल्यवान आहे. उत्साह, आनंद आणि आत्मविश्वासाने जीवन जगता आले तर जगता-जगता स्वर्गसुख मिळू शकते. क्रोध, मत्सर, चिंता आणि ताण हे नरकाचे दरवाजे आहेत; तर प्रेम, शांती, करुणा आणि आनंद हे स्वर्गाचे दरवाजे आहेत.





आपल्या मनात निर्माण होणाऱ्या अस्वस्थतेतून बाहेर पडून जर आपण स्वतः प्रती सकारात्मक झालो तर जीवनाची बाजी आपण जिंकतो. संस्कार मॉलमध्ये मिळत नाहीत, ते कुटुंबाच्या चांगल्या वातावरणात मिळतात. संत श्री लोककल्याणकारी प्रवचन समितीच्या नेतृत्वाखाली कृषी उत्पन्न बाजार समिती मैदानात आयोजित विराट सत्संग प्रवचनमालेच्या समारोप प्रसंगी ते हजारो श्रद्धाळूंना संबोधित करत होते. त्यांनी सांगितले की दिवसाची सुरुवात स्वस्थ मनाने करा. आनंदी आणि प्रसन्न मनाने दिवसाची सुरुवात करणाऱ्याचा संपूर्ण दिवस ऊर्जा आणि उत्साहाने भरलेला असतो. सकाळी मोठ्यांना प्रणाम अवश्य करा. ४जी लक्षात ठेवा माताजी, पिताजी, गुरुजी, प्रभुजी. यांचे आशीर्वाद घेतल्यास जंगलातही मंगल होते. क्रोधाच्या वातावरणातही शांत राहावे. आपण क्षमा व प्रेमाचा आधार धरल्यास कोणाच्याही नकारात्मक वातावरणातही आपण सकारात्मक राहू शकतो. इतरांनी निर्माण केलेल्या कषायाच्या परिस्थितीतही धैर्य टिकवले तर जीवनातील दुःखांपासून आपण वाचू शकतो. राष्ट्रसंतांनी सांगितले की सर्वांशी मधुरतेने वागावे. आपल्या दिलेल्या वस्तू कोणाला आठवतीलच असे नाही, पण दिलेले सौजन्यपूर्ण वर्तन आयुष्यभर स्मरणात राहते. निंदा, व्यंग्य किंवा हलक्या भाषेचा वापर टाळावा. सम्मानपूर्वक वागणूक हीच व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख आहे. आपण फक्त स्वतःचे भले न करता इतरांचेही भले केले तरच खरा लाभ मिळतो. शरीर निरोगी ठेवण्यासाठी योग करा, पण भाग्य हिरवेगार ठेवण्यासाठी इतरांची मदत करा. त्यांनी पुढे सांगितले की मोठ्याबुजुर्गांना सोनेचांदी नव्हे तर आपल्या बहूमुलांकडून मिळणारा सन्मान हवा असतो. त्यांच्या आशीर्वादाखालीच आपली प्रगती होते. जीवनात प्रत्येक पैलूत सकारात्मक राहणे आवश्यक आहे. चांगल्या फळातही साल व बिया वाया जातात, तरी त्यात ग्रहण करण्यासारखे बरेच असते. हाच दृष्टिकोन प्रत्येक व्यक्ती, वस्तू आणि परिस्थितीबद्दल ठेवावा. संगत उत्तम असेल तर रंगतही उत्तम होते. सर्पाच्या संगतीने गंगाजलही विषारी होते, तर सीपाच्या संगतीने पाणी मोती बनते. म्हणून सज्जनांची संगत करावी. त्यांनी सांगितले की आज मनुष्याजवळ ई-मेल आहे पण एकमेकांशी मेल नाही. छोट्या चुका दुर्लक्षित करून सौजन्यपूर्ण संबंध ठेवणे हीच व्यवहारकुशलता आहे. सर्वांना घेऊन चला. कितीही मोठे झालो तरी आपल्या माणसांसोबत समानतेने राहावे. जीवनात कधी कोणाची गरज पडेल सांगता येत नाही. जीवन लहान आहे जास्त मनावर घेऊ नका. जे आपल्याशी चांगले वागतात त्यांचे आभार माना आणि जे चांगले वागत नाहीत त्यांना मोठेपण दाखवून माफ करा. जीवनातील छोट्यामोठ्या घटनांनी मन खट्टू करू नये. या प्रसंगी बृज गोपाल तोषनीवाल परिवाराकडून हजारो भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. प्रवचनाने प्रेरित होऊन शेकडो लोकांनी व्यसनाचा त्याग केला. या वेळी डॉ. मुनिश्री शांतिप्रिय सागरजी महाराज म्हणाले की निरोगी राहण्यासाठी पाच गोष्टी आवश्यक आहेत प्रॉपर डाएट, प्रॉपर एक्सरसाइज, प्रॉपर ब्रीदिंग, प्रॉपर मेडिटेशन आणि प्रॉपर रिलॅक्सेशन. शरीराचे रोग औषधांनी दडपले जातात, पण मनाचे रोग ध्यानाने दूर होतात. रोज २० मिनिटे ध्यान केल्यास मेंदूच्या शंभरांहून अधिक विकारांपासून मुक्ती मिळते. औषधांचे साईड इफेक्ट वाढत चालले आहेत, त्यामुळे ध्यानच परिपूर्ण आणि साईड इफेक्टमुक्त मार्ग आहे. कार्यक्रमात संपूर्ण सत्संगाचे लाभार्थी तोषनीवाल परिवार तसेच समितीतील सर्व सदस्यांचा राष्ट्रसंतांनी व उपस्थित भक्तांनी सन्मान करून अभिनंदन केले. मंच संचालन सरोज गट्टानी यांनी केले आणि आभार बृज गोपाल तोषनीवाल यांनी मानले. या प्रसंगी परभणी, नांदेड, बोरी, जालना तसेच आसपासच्या शहरांतून मोठ्या संख्येने श्रद्धाळू उपस्थित होते. बुधवारी सकाळी १० ते १२ या वेळेत बंठा येथे विशेष सत्संग व प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे.

## बळीराजा साखर कारखाना कडुन गळीत हंगाम साठी हमी भाव प्रति मे.टन रु. २९५० जाहीर

**पूर्णा,/प्रतिनिधी-** बळीराजा साखर कारखाना लि, कानडखेड ता. पुर्णा जि. परभणी गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये ११२५६ हेक्टर ऊसाची नोंद झालेली असुन आज दिनांक ०८.१२.२०२५ रोजी ३२ दिवसात १ लाख ५५ हजार मे.टन ऊसाचे गाळप केले असुन बळीराजा कारखाना तर्फे ऊस गाळप केलेल्या शेतकऱ्यांच्या ऊस बीलास रु. २९५० प्रति मे.टन हमी भाव देण्यात येणार आहे.

त्यामध्ये पहीला हप्ता उचल रु. २५०० प्रति मे.टन, दुसरा हप्ता जुन मध्ये रु.३०० प्रति मे.टन व तिसरा हप्ता दिपावली सणासाठी रु. १५० प्रति मे.टन प्रमाणे अदा करण्यात येईल त्याच बरोबर गळीत हंगाम मधील साखर उतारा, शासनाचे एफ.आर.पी धोरणा नुसार जास्तीत जास्त ऊस दरही देण्याचा कारखाना व्यवस्थापनाचा प्रयत्न राहील व ठरल्या प्रमाणे ११ लाख मे.टन गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करावयाचे आहे तसेच बळीराजा साखर कारखान्याने नेहमीच उच्चांकी ऊस दर देवुन शेतकऱ्यांचे हीत जोपासले आहे. तरी कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक सभासद व बिगर सभासद शेतकरी यांनी घाई न करता आपल्याच बळीराजा साखर कारखानाला जास्तीत जास्त ऊस दयावा. तसेच सभासदांचा ऊस गाळप झाल्यानंतर बिगर सभासद यांचाही ऊस गाळपासाठी आणला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. कार्यक्षेत्रातील एकाही शेतकऱ्याचा ऊस शिल्लक राहणार नाही असे बळीराजा साखर कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव जाधव व कार्यकारी संचालक अजय शिवाजीराव जाधव यांनी सांगितले.




**जिंतूर- प्राथमिक आरोग्य केंद्र येलदरी अंतर्गत आरोग्य आरोग्यवर्धिनी उपकेंद्र पिंपळगाव का. अंतर्गत कुऱ्हाडी या गावी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ॲनिमिया मुक्त भारत ()या योजनेखालील १० वर्षावरील किशोरवयीन मुलींची व महिला,गरोदर माता, स्तनदा माता यांचे रक्त, बीपी शुगर, तपासणी करण्यात आली. एकूण ८२ लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी कुऱ्हाडी या गावचे मा. सरपंच रामकोर गोविंद राठोड या कार्यक्रमासाठी सहकार्य केले उपस्थित प्राथमिक आरोग्य केंद्र येलदरी येथील श्री. सी एन पुंडगे आरोग्य सहाय्यक उपस्थिती दर्शविली, उपकेंद्रातील श्री. डॉ.विजय रहाटे समुदाय आरोग्य अधिकारी, श्री. मिलिंद लाटे आरोग्य सेवक, श्रीमती. ठाकरे आरोग्य सेविका, स्वाती नेवरे आशाताई, शाळेतील सर्व शिक्षक वृंदा अंगणवाडी ताई यांनी या कार्यक्रम यशस्वी पार पाडला. तसेच महा लॅब श्री. शेख व श्री. अशोक वाकळे यांचे विशेष सहकार्य लाभले .**

## अज्ञात वाहनाच्या धडकेत शेतकऱ्याचा जागीच मृत्यू


**परभणी,/प्रतिनिधी-** पुर्णा - ताडकळस रस्त्यावर एकरुखा शिवारात अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत ५४ वर्षीय शेतकऱ्यांच्या मुत्यू झाला. ही दुर्देवी घटना ३० नोव्हेंबर रोजी घडली होती. या प्रकरणी रविवारी (दि. ७) ताडकळस पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अज्ञात वाहन चालकाने ३० नोव्हेंबर रोजीचे रात्री ८:३० वाजण्याच्या सुमारास पुर्णा - ताडकळस रस्त्यावर एकरूखा शिवारात अण्णा काशिनाथ सदगर (वय ५४ रा. हटकरवाडी ता. पुर्णा) हे शेतातुन घरी गावाकडे पायी येत असतांना अज्ञात वाहनाने त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात आण्णा सदगर यांना कपाळावर, नाकावर, चेहऱ्यावर, छातीवर, पोटावर, खरचटुन जखमा झाल्या तसेच उजवे पायाच्या गुडघ्यावर, घोट्यास, डाव्या पायाला, मांडीला, पींड्रीला मार लागुन गंभीर दुखापत झाली. त्यास प्राथमिक आरोग्या केंद्र ताडकळस दाखल केले असता तपासून डॉक्टरांनी मयत घोषित केले. अज्ञात वाहनचालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन मुत्युस कारणीभूत ठरल्याप्रकरणी साहेब काशिनाथ सगर यांच्या फिर्यादीवरून ताडकळस पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास ताडकळसचे ठाणेदार गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनात पोलीस सहायक पोलिस उपनिरिक्षक नामदेव सुजलोड हे करीत आहेत.

## चाटोरी येथील गैबीसाहेब यात्रा समितीच्या अध्यक्षपदी भागवत किरडे

**शांतीलाल शर्मा**
**पालम,/प्रतिनिधी-** मौजे चाटोरी ता पालम जी परभणी येथे गहिनीनाथ उर्फ गैबीसाहेब यात्रा कमिटीची बैठक संपन्न झाली या बैठकीत सर्वानुमते भागवत किरडे यांची अध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

उपाध्यक्ष साहेब नखाते, सचिव अंगद किरडे, सहसचिव राजेश किरडे तर सदस्य पदी त्र्यंबक सावकार किरडे,कल्याणराव किरडे, रुस्तुम पिंजारी, विनोद किरडे,माधव कांबळे, राजेभाऊ बाजीराव किरडे, रामदास कदम, नवनाथ भोंगाळे, पांडुरंग नखाते, गंगाधर मस्के, दिगंबर, अनिल किरडे, इसाक कुरेशी, बाबुराव चव्हाण, शारुख शेख,गायकवाड सह गहिनीनाथ उर्फ गैबी साहेब यात्रा महोत्सव समिती





निवड झाली तसेच दि २६ रोजी भव्य संदल होणार व दि २७ रोजी भव्य प्रमाणात पशुप्रदर्शन दि २८ रोजी भव्य कबड्डी सामने दि २९ रोजी भव्य कुस्ती संपन्न होणार या बैठकीस गावातील गोपीनाथ तुडमे, दत्तराव राठोड,तातेराव किरडे, माणिकराव किरडे, केशवराव गव्हाणे, आत्माराम किरडे, माणिकराव केंद्रे,भीमराव तुरनर, दत्तराव राठोड, मुगाजीराव किरडे, कल्याण किरडे,अनिल भैया किरडे, विनोद किरडे, आण्णासाहेब किरडे, उद्धव किरडे,सलीम शेठ, मुबारक शेख, अंकुश किरडे, तुकाराम नखाते, अमोल कदम यांच्या मार्गदर्शना खाली बैठक संपन्न झाली या वेळी गावातील असंख्य नागरिक बैठकिस उपस्थित होते.

## मार्केट कमिटी शेतकऱ्यांच्या विकासाचा आखाडा, राजकारणानाचा नाही- डॉ.रोडगे

**गंगाखेड ,/प्रतिनिधी-** कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांच्या विकासाचा आखाडा व्हावा, राजकारणाचा नव्हे, या भूमिकेतून मी सभापती पदभार स्वीकारल्यापासून आजपर्यंत पारदर्शकता, शिस्त आणि विकासाच्या दिशेने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. माझा स्पष्ट विश्वास आहे की शेतकरी विकास हेच आमचे मुख्य ध्येय आहे आणि त्यासाठी आवश्यक असलेले सर्व बदल कठोरपणे राबविणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांमध्ये शिस्तबद्धता निर्माण करण्यासाठी घेतलेले निर्णय सभापतीपद स्वीकारताच मार्केट कमिटीतील काही कर्मचाऱ्यांची कामावरील अनास्था, शिस्ताअभावी निर्माण झालेली अव्यवस्था यावर लक्ष केंद्रित केले. कार्यालयामध्ये वेळेवरती हजर राहणे. आल्याबरोबर फिंगर टेक बायोमेट्रिक हजेरी करणे. युनिफॉर्म सक्तीने लागू केले. कंप्युटर प्राविण्य अनिवार्य केले खोट्या प्रमाणपत्रांवर प्रमोशन घेतलेल्या प्रकरणांची चौकशी. रोज केलेल्या कामाचा अहवाल ( ) कळवणे आवश्यक आहे. रोजनिशी लिहिणे बंधनकारक केले. रजेचे नियम कठोरपणे लागू केले. रोजच्या हालचालीचे रजिस्टर सुरू केले. वसुली झालेली बँकेत रोज जमा करण्याचे आदेश. कोणत्याही संचालकाकडे कर्मचाऱ्यांनी पैसे जवळ न ठेवता बँकेत जमा करावे. या सर्व नियमांमुळे काही



कर्मचारी विरोध करीत असले तरी ९०% कर्मचारी पूर्ण सहमतीने शिस्तबद्ध पद्धतीने कामाला लागले आहेत. शिस्त लावणे हे मोठे आणि आव्हानात्मक काम असले तरी ते मी दृढनिश्चयाने राबवत आहे. शेतकरी हितासाठी केलेली विकासकामे. शेतकऱ्यांना थेट फायदा होईल अशा अनेक उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली.

मार्केट यार्ड विकास मार्केट यार्डातील जागांची दुरुस्ती करून घेतली. त्याठिकाणी जनावरांचा बाजार सुरु केला. विरोध करणाऱ्यांनी त्या ठिकाणी कधीही भेट न देता केवळ बैठका घेऊन अडथळे निर्माण केल्याचे दुःख.

* खरेदी व्यवस्थेत सुधारणा.
* चे कापूस खरेदी केंद्र सुरू केले.
* कापूस खरेदी मर्यादा वाढविण्यासाठी शासनाशी पाठपुरावा.
* नाफेडमार्फत सोयाबीन खरेदी चालू
* मागील कार्यकाळात ४ वर्ष बंद असलेला काटा आम्ही सुरू केला.
* शेतकऱ्यांच्या शेतमालासाठी मोंढ्यामध्ये बीट सुरू केले. शेतकरी सुविधा
* कमी दरात चाळणी यंत्र सुरू शेतकऱ्यांना थेट लाभ.
* शेतीनिष्ठ पुरस्कारांचे वितरण.
* व्यापारी, हमाल, जिनिंग संचालक यांच्या बैठका घेऊन संवाद वाढवला.

राजकारणाला बाजूला ठेवून फक्त शेतकरीहित सध्या काही मंडळी तांत्रिक कारणांचा आधार घेऊन गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण माझी आणि संपूर्ण टीमची भूमिका स्पष्ट आहे शेतकऱ्याच्या जात-पात-पक्ष न पाहता सर्वांचा विकास करणे. गरज पडल्यास शेतकऱ्यांसाठी वैयक्तिक मदत करण्याचीही आमची तयारी असते, आणि हे काम आम्ही सातत्याने करतही आहोत. सभापती डॉ. संजय रोडगे यांचे स्पष्ट मत ''कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांच्या विकासाची जागा आहे. येथे राजकारणाला स्थान नाही. शिस्त, पारदर्शकता आणि शेतकरीहित या तीन आधारस्तंभावर आम्ही काम करत आहोत. कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार सहन केला जाणार नाही. मार्केट कमिटीचा प्रत्येक निर्णय शेतकऱ्याच्या भल्यासाठीच असेल.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



गेवराई तालुक्यातील मन्यारवाडी येथील शेतकरी महादेव डिगरे यांच्या शेतातील पपईच्या बागेला अशा पपई लगडल्या आहेत.

# डोळ्यांच्या प्लास्टिक सर्जरीचे शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१० डिसेंबर**

देशमुख आय हॉस्पिटल, गेवराई व श्री गजानन स्पेशालिटी आय सेंटर, संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने डोळ्यांच्या प्लास्टिक सर्जरी संदर्भात विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये अत्याधुनिक मशिनद्वारे डोळ्यांची सखोल तपासणी करण्यात येणार आहे. नासूर (डॅक्रियोसिस्टायटिस) चे अद्यावत उपचार, डोळ्यांच्या कर्करोगाचे निदान व उपचार, डोळ्यात जन्मतः असलेल्या व्यंगांचे उपचार, डोळ्यांच्या झडपा व बुबळाशी संलग्न गाठी/ट्युमरवर शस्त्रक्रिया व उपचार, थायरॉईडशी संबंधित डोळ्यांचे आजार यांचे निदान व उपचार करण्यात येणार आहेत. तसेच



गरजू रुग्णांसाठी कृत्रिम बुबळ्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

हे शिबिर देशमुख आय हॉस्पिटल, कुलकर्णी प्लाझा, तळमजला, माळी गल्ली, गेवराई येथे आयोजित करण्यात आले असून, शिबिराचे आयोजन डॉ. किशन देशमुख (नेत्ररोगतज्ज्ञ) व डॉ. आश्विनी किशन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. यासाठी विशेष तज्ज्ञ डॉ. पल्लवी खेडकर उपस्थित राहणार आहेत. या शिबिरासाठी नाममात्र शुल्क आकारण्यात येणार असून, नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# एड्स जनजागृती अभियान राबविणे आजच्या काळाची गरज–सुहास कुलकर्णी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० डिसेंबर**

दि.०८/१२/२०२५ सौ. के.एस.के महाविद्यालय व रेड रिबन क्लब आणि जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये एड्स जनजागृती अभियान संपन्न झाले.


यावेळी मार्गदर्शन करताना आयसीटीसीचे कार्यक्रमाधिकारी श्री. सुहास कुलकर्णी म्हणाले की, एच.आय.व्ही चे प्रमाण हे महाराष्ट्रात बीड जिल्हयामध्ये कमी असून हेच आजपर्यंत केलेल्या एड्स जनजागृती अभियानाचे फलीत आहे. आजच्या तरुण तरुणींनी विवाह करताना एच.आय.व्ही. ची तपासणी करुनच लग्न करावे. माता जरी पॉझीटीव्ह असली तरी जन्माला येणारे अपत्य हे पॉझीटीव्ह असेलच असे नाही. अपत्य हे एच.आय.व्ही. बाधीत नसते. असे अनेक उदाहरणे समाजात आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना आयसीटीसीचे समुपदेशक श्री. जनार्धन माजपल्ले म्हणाले की, एड्स या रोगास घाबरण्याचे कारण नाही कारण हा रोग संसर्गजन्य नाही. या आजाराबाबत फारशी जागृकता नसल्यामुळे दरवर्षी जनजागृती अभियानाची आवश्यकता पडते. हा आजार असा आहे की वेळीस उपचार घेतल्यानंतर आजारावर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. आजही लोकांच्या मनात अनेक समज गैरसमज आहेत. ते दुरु करणे हे या अभियानाचे प्रमुख कार्य आहे.

हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला . या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. बालासाहेब पोटे तर आभार डॉ. यादव घोडके यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक व स्यंयसेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

## सौर ऊर्जा कृषी पंप योजनेत बीड जिल्हा प्रथम (अव्वल) ग्राहक पंचायत मागणीला यश–अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१० डिसेंबर**



मागेल त्याला सौर ऊर्जा सुरू करण्यात आली. त्यामध्ये ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांनी सौर ऊर्जा मिळण्यासाठी मिळण्यासाठी माहे एप्रिल २०२४ पासून वारंवार मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री , महासंचालक पुणे, मुख्य अभियंता लातूर, जिल्हा ऊर्जा व्यवस्थापक बीड यांच्याकडे बीड जिल्ह्यात शेती शिवाय तर कसल्या प्रकारचे शेतकरी ग्राहकाला उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे सौर ऊर्जा लाभ मिळणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत वारंवार पत्रव्यवहार प्रत्यक्ष भेटी वारंवार मागणी केल्यामुळे सौर ऊर्जा योजनेत लातूर जिल्ह्यात बीड जिल्हा ७४६७ सौर ऊर्जा पंप बसवण्यात आले. लातूर परिमंडळात१०४०४ आले त्यात लातूर जिल्ह्यात ९०० धाराशिव मध्ये २०३७ तर बीड जिल्ह्यात ७४६७ सौर ऊर्जा पंप बसविण्यात आले अशी माहिती समजते. सौर ऊर्जा योजनेत लातूर विभागात बीड जिल्हा प्रथम (अव्वल) आलेला आहे. हे यश ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांनी वारंवार शासनाकडे पाठपुरावा केल्यामुळे शक्य झाले आहे असे निदर्शनास येत आहे अशी माहिती बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे नमूद केले आहे .याप्रकरणी जिल्ह्यातील संपादक मंडळी विविध पत्रकार प्रतिनिधी यांनी सौर ऊर्जा शेतकरी हितासाठी ग्राहकाच्या वारंवार बातम्या प्रसिद्ध करून ग्राहक पंचायत कार्यास मोलाचे सहकार्य केलेल आहे. बीड जिल्हा प्रथम स्थानी अव्वल येण्यात या यशात त्यांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग आहे.

# लिंबागणेश परीसरात बिबट्याचा संचार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० डिसेंबर**

आज सकाळी महावितरण उपकेंद्र लिंबागणेश येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या पुढाकारातुन सहाय्यक अभियंता महेश गायकवाड यांच्याशी डॉ. गणेश ढवळे, ग्रामस्थ आणि शेतकऱ्यां सोबत चर्चा झाली. ग्रामस्थांची अडचण समजून घेत त्यांनी कृषी पंपांसाठी रात्रीऐवजी दिवसा वीजपुरवठा देण्यास मान्यता दिली.अशी माहिती राजेंद्र मस्के यांनी दिली आहे. या निर्णयामुळे लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून उद्याचा रस्ता रोको आंदोलन स्थगित केले आहे. असे समाजसेवक डॉक्टर गणेश ढवळे यांनी सांगितले आहे. लिंबागणेश परिसरात बिबट्या आढळून आल्याने पिंपरनई, पोखरी (घाट), बेलगाव, सोमनाथवाडी, मसेवाडी,मोरगाव-फुकेवाडीकाळेवाडी, गणेशनगर अशा पंचक्रोशीतील गावांमध्ये ग्रामस्थ व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

शेतकऱ्यांना रात्री कृषी पंप सुरू असताना पिकांना पाणी देण्यासाठी अंधारात शेतात जाण्याचा धोका वाढत होता. बिबट्याचा वावर लक्षात घेता त्यांच्या जीवितास गंभीर संकट निर्माण होत असल्यामुळे कृषी पंपासाठी दिवसा नियमित वीजपुरवठ्याची मागणी जोर धरत होती. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उद्या (दि.११) लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे दिला होता. अभियंत्यांसोबत चर्चेला सकारात्मक प्रतिसाद - मागणी मान्य कृषी पंपांसाठी रात्रीऐवजी दिवसा वीजपुरवठा देण्यास मान्यता दिली.यामुळे उद्या होणारे रास्तारोको आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याची माहिती डॉ. गणेश ढवळे यांनी दिली. या चर्चेला आणि मागणीसाठी पुढाकार घेण्यात राजेंद्र मस्के (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार गट) यांची प्रमुख उपस्थिती होती. कृषी पंपांना दिवसा वीजपुरवठा करण्याबाबत त्यांनी सहाय्यक अभियंता, उपकेंद्र लिंबागणेश आणि उपकार्यकारी अभियंता, बीड ग्रामीण विभाग यांना पत्रव्यवहाराद्वारे पाठपुरावा केला आहे. या बैठकीत बालासाहेब जाधव (सरपंच), राजेभाऊ आप्पा गिरे (माजी पंचायत समिती सदस्य), कल्याण वाणी (माजी सरपंच), रविंद्र निर्मळ (चेअरमन, सेवा सोसायटी), पत्रकार हरिओम क्षीरसागर, दामोदर थोरात, मोहन कोटुळे, बिभीषण मुळीक (सरपंच, पोखरी), बाळासाहेब वायभट (सरपंच, पिंपरनई), शहादेव कोल्हे, पांडुरंग वाणी, अँड. गणेश वाणी, विक्रांत वाणी, सुरेश निर्मळ, संतोष भोसले, अभिजित गायकवाड, सर्पमित्र अशोक जाधव, संतोष वाणी, संजय सुकाळे, तुकाराम गायकवाड, अंबादास ढास, अजित मंडलिक, बिभीषण वाणी, घाडगे गणेश, मुळे जीवन, सचिन गिरे, आरूण निर्मळ, रामदास मुळे, बंकट लगास, विलास वायभट, अभिमान वाणी, कृष्णा वायभट, रविंद्र ढास यांचा समावेश होता.

# स्वा.सावरकर महाविद्यालयात उच्च शिक्षणातील गुणवत्ता विषयावर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० डिसेंबर**

येथील स्वा. सावरकर महाविद्यालयात 'फॉर्मलायझेशन ऑफ इन्स्टिट्यूशनल क्वालिटी एनहान्समेंट स्ट्रॅटेजी' या विषयावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी स्वा. सावरकर महाविद्यालय बीडचे प्राचार्य प्रा.डॉ. सुहास मोराळे हे होते. कार्यशाळेसाठी नॅक पिअर टीम सदस्य राहिलेले निवृत्त प्राचार्य डॉ. ना.शे. धर्माधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी मंचावर उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. कृष्णा बारटक्के यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात डॉ. कृष्णा बारटक्के यांनी सांगितले की, महाविद्यालयाच्या उच्च शिक्षण धोरणाचा कौशल्यपूर्ण पद्धतीने अंगीकार करण्याच्या हेतूने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या मार्गदर्शन पर भाषणात बोलताना डॉ. धर्माधिकारी म्हणाले की, उच्च शिक्षणातील नवे प्रवाह आत्मसात करणे आवश्यक आहे. परिणाम



आधारित शिक्षण प्रक्रिया विकसित करत असताना भारतीय ज्ञान परंपरा, सुजनशीलता नाविन्यपूर्णतेचा शैक्षणिक उपक्रमात समावेश असावा. उच्च शिक्षणातील विविध पैलूंना स्पर्श करत डॉ. धर्माधिकारी यांनी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात बोलताना प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की, उच्च शिक्षणातील गुणवत्तेत सातत्याने वाढ करण्यासाठी स्वा. सावरकर महाविद्यालयाच्या वतीने कार्यपद्धती विकसित करण्यात येत असते. अद्ययावत तंत्रज्ञानासह कार्यपद्धतीचा अवलंब करत विद्यार्थी केंद्रित आणि समाजाभिमुख उपक्रम राबविले जातात. भारतीय ज्ञान परंपरेला उजाळा देत त्यातून प्रेरणा घेण्यासाठी सातत्याने प्रोत्साहित केले जाते. महाविद्यालयातील उच्च शिक्षण प्रक्रिया प्रभावी होण्याच्या दृष्टीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. संजय काळे यांनी केले तर आभार प्रा.डॉ. हंसराज जोशी यांनी व्यक्त केले. कार्यशाळा सुरळीत पार पडण्याच्या दृष्टीने सत्र नियोजन आणि व्यवस्थांसाठी सहसमन्वयक डॉ. सुभाष पटेकर, कार्यालय अधीक्षक डॉ. प्रशांत तालखेडकर यांनी परिश्रम घेतले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला.

# पिंपळवाडी सबस्टेशन ५ MVA क्षमतेचा ट्रांसफार्मरला मान्यता–राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० डिसेंबर**

बीड तालुक्यातील पिंपळवाडी स्टेशन करिता ५ MVA क्षमतेचा नवीन ट्रांसफार्मरला मान्यता मिळाली असून लवकरच हे काम पूर्ण केले जाईल. या ट्रांसफार्मर मुळे पिंपळवाडी सबस्टेशनची क्षमता दुप्पटीने वाढणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.

तसेच सूर्याचीवाडी भाळवणी, देवऱ्याचीची वाडी आधी परिसरात दोन दिवसात होणारा विद्युत पुरवठा रद्द करून दिवसात दोन टप्प्यांत विद्युत पुरवठा केला जाणार आहे.

आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष माननीय राजेंद्र मस्के यांनी, अधीक्षक अभियंता महाराष्ट्र विद्युत कंपनी



बीड यांची भेट घेतली. सूर्याचीवाडी ग्रामस्थासह भेट घेऊन मागण्यांची निवेदन दिले. सूर्याचीवाडी, देवऱ्याचीवाडी भाळवणी, मांडवजाळी मंजरी, आदमानेवस्ती वायकर वस्ती या गावांना दोन दिवसाआड विद्युत पुरवठा करण्याऐवजी एक दिवसात दोन टप्पे करून खालील गावांना दिवसा विद्युत पुरवठा करण्यात यावा. या मागणी केली. या मागणीला मान्यता मिळाली आहे. पिंपळवाडी स्टेशनवर क्षमतेपेक्षा जास्त विद्युत लोड वाढल्याने आवश्यक त्या प्रमाणात विद्युत पुरवठा होत नाही. शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना सुरळीत वीजपुरवठा होत नाही. या भागातील विद्युत पुरवठा सुरळीत होऊन शेतकऱ्यांच्या मुबलक विद्युत पुरवठा व्हावा यासाठी पिंपळवाडी बिंदुसरा नदीवरील पुल कामाबरोबर पिंपळवाडी ३३ केव्हीसब स्टेशनची क्षमता वाढवण्यासाठी

नवीन ट्रांसफार्मर करिता पाठपुरावा केला होता. ट्रांसफार्मर ला मान्यता मिळाली असून तेथे काही दिवसात हे काम पूर्ण होईल. व पिंपळवाडी सब स्टेशन वरील सर्व विद्युत ग्राहकांना उच्च दाबाने विद्युत पुरवठा होईल.

# परळी तालुक्याचे भूमिपुत्र फुलचंद गुट्टे यांचे जागतिक आयर्नमॅन स्पर्धेत यश

## फुलचंद गुट्टे यांच्या यशाने परळी शहराची जागतिक स्तरावर नोंद

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१० डिसेंबर**

बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ ही बारा ज्योतिर्लिंग पैकी एक प्रभू वैद्यनाथाची भुमी आहे. परळी वैद्यनाथ तालुक्यातील भूमिपुत्र फुलचंद दत्तात्रय गुट्टे यांनी कॅलिफोर्निया (अमेरिका) येथे पार पडलेल्या अतिशय कठीण असलेल्या जागतिक आयर्नमॅन स्पर्धेत सहभाग घेत पहिल्याच प्रयत्न यश मिळविले आहे. फुलचंद गुट्टे यांनी खडतर स्पर्धेमध्ये यश मिळवत अभिमानास्पद कार्य करून परळी वैद्यनाथसह बीड जिल्ह्याचे नांव जागतिक स्तरावर उंचावले आहे.इच्छाशक्तीच्या बळावर जागतिक आयर्नमॅन स्पर्धेत मिळवलेले हे यश इतरांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

कॅलिफोर्निया (अमेरिका) : जगातील सर्वात कठीण ट्रायथलॉन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आयर्नमॅन स्पर्धेत बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील भूमिपुत्र फुलचंद दत्तात्रय गुट्टे यांनी उल्लेखनीय कामगिरी करत ६ तास ३१ मिनिटांत स्पर्धा पूर्ण केली. जागतिक स्तरावर घेतल्या जाणाऱ्या या अवघड व खडतर स्पर्धेत ३० ते ३४ वयोगटात फुलचंद गुट्टे (वय ३२) यांनी दमदार कामगिरी



करत २ हजार सहभागी खेळाडूंपैकी आपली वेगळी छाप उमटवली. या स्पर्धेत २ किमी पोहणे, ९० किमी सायकलिंग, २१ किमी धावणे असा तीन टप्प्यांचा अत्यंत कठीण प्रवास असतो. याप्रमाणे विक्रमी वेळेत यशस्वीरित्या पूर्ण करत आपल्या कारकर्दीतील पहिली आयर्नमॅन स्पर्धा पार केली आहे. कॅलिफोर्नियातील थंड हवामानात पाण्याचे तापमान केवळ १० डिग्री होते, तरीही त्यांनी चिकाटीने प्रत्येक टप्पा पूर्ण केला.

आयर्नमॅन स्पर्धेची सुरुवात १९७८ मध्ये झाली असून आज ही स्पर्धा जगातील ७ खंडांमध्ये घेतली जाते. भारतातून तब्बल १०० खेळाडूंनी या प्रतिष्ठित स्पर्धेमध्ये आतापर्यंत सहभाग नोंदवला आहे. बीड जिल्ह्यातून ही स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण करणारे फुलचंद गुट्टे हे पहिले खेळाडू ठरले. फुलचंद गुट्टे यांनी यापूर्वी ४२ किमी मेराथॉन फक्त ४ तास २ सेकंदांत पूर्ण करत आपल्या फिटनेसची छाप पाडली होती. आयर्नमॅन पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली अतिशय उच्च सहनशक्ती, पोषण व्यवस्थापन, मानसिक ताकद आणि शिस्त यांचा उत्तम संगम फुलचंद गुट्टे यांनी या स्पर्धेत दाखवून दिला. जगभरातील खेळाडूंमध्ये भारताचा व महाराष्ट्राचा झेंडा उंचावल्याबद्दल फुलचंद गुट्टे यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# उसाच्या फडामधून केली अल्पवयीन पीडितेची सुटका व आरोपीला घेतले ताब्यात

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (AHTU) बीडची सांगली येथे कार्यवाही

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० डिसेंबर**

पोस्टे वडवणी गुन्हा रजिस्टर नंबर १७६/२०२४ कलम १३७(२), १४३(२) हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे नुकताच वर्ग झाला होता . पोउपनि पल्लवी जाधव यांनी मूळ फाइल चे अवलोकन केले. त्यानंतर फिर्यादी व साक्षीदार यांच्याकडे वारंवार चौकशी करून सुद्धा उपयुक्त माहिती मिळाली नाही. शेवटी तांत्रीक माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी यांचे वास्तव्य सांगली जिल्ह्यात असल्याचे समजले. त्यावरून दिनांक ०८/१२/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वाजता AHTU ची टीम ही मा. एसपी सर यांच्या परवानगीने सांगलीला रवाना झाली. दुपारी सांगली येथे पोहोचल्यावर, टीम पीडित व आरोपीचा शोध घेत होती. दिवसभर शोध घेतल्यानंतर त्यांच्या वास्तव्याचा



ठिकाणा मिळाल्यावर AHTU टीम तेथे दबा धरून बसली होती. शेवटी रात्री ०९:०० वाजे दरम्यान पीडित मुलगी व आरोपी हे दोघे ऊस तोडून कोपी मधे येताच त्यांना ताब्यात घेतले व पोस्टे सांगली ग्रामीण येथे हजर केले व टीम बीड कडे रवाना झाली. त्यानंतर AHTU ची टीम पोस्टे वडवणी येथे आली व सदर पीडीत मुलगी व आरोपीला पुढील तपासकामी पोस्टे ला हजर केले.

सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत सर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली झडख पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोशी योगेश निर्धार , अश्विन सुरवसे सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

# जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी घेतला आरोग्य विभागाचा आढावा

## रोगनियंत्रण व गुणवत्ता वाढीवर लक्ष देण्याचे दिले निर्देश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० डिसेंबर**
जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आरोग्य विभागाचा आढावा घेण्यात आला.
या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलाश शेळके, जिल्हा शल्य चिकित्सकांचे प्रतिनिधी डॉ. नामदेव पवार, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. सतीश रुणवाल, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एस. शैलेजा कुपास्वामी, तसेच विविध आरोग्य कार्यक्रमांचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हॉट एरिया मॅपिंग करून साखर कारखाने, वीटभट्ट्या, झोपडपट्टी वस्त्या आदी ठिकाणी विशेष तपासणी शिबिरे घेऊन क्षयरोग तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. यासोबतच गरोदर मातांची तपासणी करुन रुग्णांना उपचाराखाली आणून नियमित औषधोपचार देण्यावर भर देण्यात आला.
राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय कुष्ठरोग शोध मोहिमेचा आढावा यावेळी घेण्यात आला.
एनसीडी पोर्टलवरील उच्च रक्तदाब, मधुमेह व कॅन्सर स्क्रीनिंगचे कामकाज अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत सक्त सूचना देण्यात आल्या. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन कार्यक्रमांतर्गत निर्धारित निर्देशांकांची पूर्तता करून या महिन्यात ९ आरोग्य संस्था व पुढील महिन्यात ११ आरोग्य संस्था एनक्यूएएस (छटअड) प्रमाणित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.
निति आयोगाने घोषित आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत हिंगोली तालुक्याने आयोगाने दिलेल्या निर्देशांकानुसार कार्यवाही करून कामगिरीत सुधारणा करावी. यासाठी बेसलाईन सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी मानसिक दडपणाखाली असलेल्या रुग्णांचे समुपदेशन करून सकारात्मक परिवर्तन घडविण्यावर भर देण्याचे निर्देश दिले.
तसेच गरोदर मातांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण तपासण्यासाठी एचएलएलमार्फत तपासणी करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. आवश्यकतेनुसार औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याचेही निर्देश जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दिले.

# दिव्यांग विषयक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे निर्देश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० डिसेंबर**
दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणीचा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित ऑनलाईन बैठकीत सविस्तर आढावा घेतला.
या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा शल्य चिकित्सकांचे प्रतिनिधी, वैद्यकीय अधिकारी डॉ.बालाजी भाकरे, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी गीता गुठ्ठे तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी व तहसीलदार ऑनलाईन उपस्थित होते.
यावेळी ५ टक्के दिव्यांग राखीव निधीबाबत करण्यात आलेली कार्यवाही, सुगम इमारत, दिव्यांग छळ प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी, सर्व आस्थापनांनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्रधारकांवर केलेली कारवाई, दिव्यांग व्यक्तींना रेशन कार्ड वाटप, संजय गांधी निराधार योजनेंतर्गत दिव्यांगांसाठी वाढीव अनुदान तसेच जिल्हा वार्षिक योजनेतील एक टक्का निधी खर्च आदी विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.
जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सार्वजनिक बांधकाम विभागांनी सुगम इमारतींच्या अनुषंगाने शासकीय इमारतींचे क्रमांकन (रँकिंग) निश्चित करून त्याचा सविस्तर अहवाल शुक्रवारपर्यंत सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच अपंग पुनर्वसन केंद्राच्या इमारतीची सद्यस्थिती, सुविधा व आवश्यकता यांचा आढावा घेऊन आवश्यक त्या सुधारात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.
दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ वेळेत व पारदर्शक पद्धतीने मिळावा, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून जबाबदारीने अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी दिले.

# वाळु तस्करांची मंडळ अधिकाऱ्यांना जीवे मारण्याची धमकी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० डिसेंबर**
कळमनुरी तालुक्यात वाळू तस्करांनी वाळूचे अवैध वाहतुक करणारे ट्रॅक्टर पकडल्यानंतर मंडळ अधिकाऱ्यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या दोन ठिकाणी घटना घडल्या असून वाळू तस्करांविरोधात कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी पथके रवाना केली आहेत.
जिल्ह्यात पूर्णा, कयाधू नदीमधून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा आणि अवैध वाळूची वाहतुक दररोज होत आहे. वाळू तस्कर रात्री किंवा पहाटेच्या वेळी टिप्पर, ट्रॅक्टर द्वारा अवैध वाळू वाहतुक करतांना दिसत आहेत. अवैध वाळू वाहतुक करणारे वाहन आणि वाळू तस्करांच्या आलीशान गाड्या त्यांच्या मागेपुढे जातांना दिसत आहेत. या वाहनांमुळे ग्रामीण भागातील रस्ते तसेच त्या परिसरातील रस्त्यांची दुर्दशा होत आहे. कोणी विरोध केल्यास त्याला धमक्या देऊन शांत बसविण्याचे काम हे वाळू तस्कर करीत आहेत.
शासनाचा लाखो रूपयांचा महसूल अवैध वाळू उपसा आणि अवैधवाळू मुळे बुडत आहे दुसरीकडे वाळू तस्कर मात्र गब्बर बनत असतांना दिसत आहेत. वाळुचा भाव गगनाला भिडला असून बांधकामासाठी नाईलाजास्तव वाळू तस्करांकडून वाळू विकत घ्यावी लागत आहे.
कळमनुरी तालुक्यात कयाधू नदी व इतर वाळू घाटावरून वाळुची अवैध वाहतुक रोखण्यासाठी उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते, तहसीलदार जीवककुमार कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथके स्थापन करण्यात आली आहेत. दि ९ डिसेंबर रोजी मंडळ अधिकारी शिल्पा सरकटे, किरण पावडे, गजानन तेलेवार, मिनाक्षी खंदारे, ग्राम महसुल अधिकारी गणेश धाडवे यांचे पथक तपासणीसाठी गेले होते. यावेळी सोडेगाव ते नांदापूर फाटा मार्गावर एका ट्रॅक्टरची पाहणी केली असता त्यात वाळू आढळून आली. सदर ट्रॅक्टर कळमनुरी येथे आणत असतांना चालक ऋषीकेश नीळकंठे, भागवत नीळकंठे व एका कार चालकाने ट्रॅक्टर अडवून सरकारी कामात अडथळा आणला तसेच मंडळ अधिकारी सरकटे यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली व ट्रॅक्टर घेवून पळून गेले.
दुसऱ्या एका घटनेत सालेगाव शिवारात ट्रॅक्टर चालक नितीन गुठ्ठे याने मंडळ अधिकारी गजानन तेलेवार यांचयसोबत झटापट करून त्यांना जीवे मारण्याची धमकी देत सरकारी कामात अडथळा आणला. ट्रॅक्टरसह पळ काढला.



**हिंगोली– उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटनेच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास दि १० डिसेंबर रोजी नागपूर येथे महामोर्चा, उपोषण, बेमुदत धरणे करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते. छाया– विजय गुंडेकर**

# दूरदर्शनच्या कृषी कार्यक्रमांचे नियोजन जानेवारी ते मार्च पहिल्या तिमाहीचे वेळापत्रक निश्चित

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० डिसेंबर**
दूरदर्शन केंद्र, मुंबई यांच्या कृषीविषयक कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी कळमनुरी तालुक्यातील कृषी विज्ञान केंद्र येथे दि. ८ डिसेंबर २०२५ रोजी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीत दूरदर्शनवर प्रसारित होणाऱ्या 'कृषिदर्शन'आणि 'आमची माती, आमची माणसं'या कार्यक्रमांतील विषयांवर चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात आला.




शेतकऱ्यांपर्यंत नवीन कृषी तंत्रज्ञान, संशोधन व नवकल्पनांची माहिती सोप्या भाषेत पोहोचवणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. यासाठी दूरदर्शनचे अधिकारी, कृषी शास्त्रज्ञ व प्रगतशील शेतकरी यांनी एकत्रितपणे विषयनिहाय सविस्तर चर्चा केली.
या बैठकीत निवडलेल्या विषयांनुसार आगामी कार्यक्रमांमध्ये चिया बियांची शेती, सेंद्रिय शेती पद्धती, गायीच्या शेणापासून धूप व अगरबत्ती निर्मिती, मोहाच्या फुलांपासून प्रक्रिया पदार्थ, हळद प्रक्रिया उद्योग, यशस्वी रोपवाटिका व शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या यशोगाथा, आधुनिक कृषी अवजारे तसेच सोयाबीन पिकासाठी रुंद वरंबा सरी (बीबीएफ) पद्धतीचा समावेश करण्यात येणार आहे.
या बैठकीचे आयोजन तोंडापूर कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. पी. पी. शेळके यांनी केले. बैठकीस दूरदर्शनचे मनोज जैन, विनायक मोरे व सुदर्शन चापके (परभणी) उपस्थित होते. संत नामदेव संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार शिवाजीराव माने यांनी दूरध्वनी संदेशाद्वारे उपस्थितांचे स्वागत करून हिंगोली जिल्ह्यातील सिंचन अनुशेषाबाबत दूरदर्शनने सहकार्य करावे, असे आवाहन केले. त्यांच्या वतीने श्री. महेंद्र माने व सौ. माधुरी माने उपस्थित होत्या.
यावेळी जालना येथील शास्त्रज्ञ डॉ. एस. व्ही. सोनुने, पालघर येथील रिजवाना सय्यद तसेच तोंडापूर केव्हीकेचे शास्त्रज्ञ राजेश भालेराव, श्रीमती रोहिणी शिंदे व डॉ. अतुल मुराई यांनी सहभाग घेतला. प्रगतशील शेतकरी चंद्रशेखर असोले व चंद्रकांत देशमुख यांनीही सूचना केल्या.
आगामी काळात महिला शेतकऱ्यांच्या यशोगाथा तसेच शेतीमालावर प्रक्रिया करून उत्पन्नवाढ कशी साधता येईल, याविषयीचे कार्यक्रम दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवर प्रसारित करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# सेनगाव येथील अवैध तंबाखू विक्री करणाऱ्या पान टपऱ्यांवर कार्यवाही

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० डिसेंबर**
जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या आदेशानुसार अधिष्ठाता चक्रधर मुंगल व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष व जिल्हा पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने सेनगाव शहरात अवैध तंबाखू विक्री करणाऱ्या पान टपऱ्यांवर आज दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी धडक कार्यवाही करण्यात आली.
हिंगोली शहर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक मस्के यांच्या सहकार्याने करण्यात आलेल्या या कारवाईत सेनगाव शहरातील एकूण १० अवैध तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली असून एकूण ५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.
ही कारवाई जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाचे जिल्हा सल्लागार डॉ. किरण राजाभाऊ लोंढे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. यावेळी कुलदीप केळकर (मानसशास्त्रज्ञ), आनंद साळवे (सोशल वर्कर), मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे व्यवस्थापक मंगेश गायकवाड, सेनगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक श्री. खंदारे, पोलीस हेड कॉन्स्टेबल के. एम. थिटे तसेच पोलीस कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.
तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणारे आरोग्यविषयक दुष्परिणाम लक्षात घेता जिल्हाभरात अशीच तपासणी व दंडात्मक कार्यवाहीची मोहीम सुरू ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.
कोटपा कायदा–२००३ नुसार कलम ४ अन्वये सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी, कलम ५ अन्वये तंबाखूयुक्त कोणत्याही पदार्थाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जाहिरातीस बंदी, कलम ६ (अ) नुसार १८ वर्षांखालील मुलांना तंबाखूयुक्त पदार्थांची विक्री करणे किंवा त्यांच्याकडून विक्री करून घेणे हा कायद्याने गुन्हा आहे. कलम ६ (ब) नुसार शैक्षणिक संस्थांच्या चारही बाजूंनी १०० मीटरच्या परिसरात तंबाखूयुक्त पदार्थ विक्रीस बंदी आहे. तर कलम ७, ८, ९ नुसार तंबाखूजन्य पदार्थांच्या पॅकेटवर ८५ टक्के भागावर चित्रात्मक व लिखित वैधानिक इशारा स्पष्टपणे छापलेला असणे बंधनकारक आहे.

## संक्षिप्त वृत्त

### अज्ञात व्यक्तीने धुरा जाळल्याने तुरीचे नुकसान



हिंगोली– जिल्ह्याच्या गणेशपुर येथे काल दिनांक ९ डिसेंबर मंगळवार रोजी सायंकाळी अज्ञात व्यक्तीने धुरा जाळल्याने काढणीस आलेल्या तूर पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या आगीमध्ये शेतकऱ्याचे अंदाजे एक लाख रुपयाचे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले असून या नुकसानीचा पंचनामा करून नुकसान भरपाईची शेतकरी एकनाथ वाणी यांनी १० डिसेंबर वार बुधवार सकाळी दहा वाजता पंचनामा करून नुकसान भरपाईची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

# खरीप व रब्बी २०२४ मधील पीकविमा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० डिसेंबर**
जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या सक्षम प्रशासकीय नेतृत्वाखाली व जिल्हा प्रशासनाच्या प्रभावी समन्वयामुळे हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक दिलासा मिळाला आहे.
प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत खरीप हंगाम २०२४ व रब्बी हंगाम २०२४–२५ साठी पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये थेट नुकसान भरपाई जमा करण्यात आली आहे.
या दोन हंगामांसाठी जिल्ह्यास २९७ कोटी ५० लाख रुपयांची पिकविमा नुकसान भरपाई मंजूर झाली असून ही रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये वर्ग करण्यात आली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पिक नुकसानीनंतर एचडीएफसी इआरजीओ विमा कंपनीमार्फत ही आर्थिक मदत वेळेत वितरित करण्यात आली आहे.
जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पिकविमा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वेळोवेळी आढावा बैठका घेऊन मार्गदर्शन केले. त्यांच्या सूचनेनुसार पीक नुकसानीची माहिती तातडीने विमा कंपनीकडे सादर करून नुकसान भरपाईचे वितरण वेळेत पूर्ण करण्यात आले.
हंगामनिहाय सहभाग व विमा संरक्षण– खरीप हंगाम २०२४ मध्ये ४.७२ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी सहभाग घेऊन १६६१ कोटी रुपयांचा विमा संरक्षित केला होता, तर रब्बी हंगाम २०२४ मध्ये १.३५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवून ४१५ कोटी रुपये रकमेचा विमा संरक्षित केला आहे.
नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या नुकसानीनंतर एचडीएफसी इआरजीओ विमा कंपनीद्वारे हंगामनिहाय भरपाईची रक्कम वितरीत करण्यात येत आहे. यामध्ये खरीप २०२४ यासाठी १९५.४५ कोटी रुपये, रब्बी २०२४–२५ साठी १०२.०५ कोटी रुपये अशी एकूण २९७ कोटी ५० लाख रुपये वितरीत करण्यात आले आहेत. ही भरपाई रक्कम जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी कृषी क्षेत्रातील अनिश्चिततेत मोठा आर्थिक आधार ठरली आहे.
प्रलंबित भरपाईबाबत सूचना– खरीप व रब्बी हंगामातील मिळून एकूण १ कोटी ३७ लाख रुपयाची रक्कम विविध तांत्रिक कारणांमुळे (जसे की एक हजार रुपयांपेक्षा कमी दावे, केवायसी अपूर्ण असणे, खाते बंद असणे इ.) प्रलंबित आहेत. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी विमा कंपनीने तात्काळ संबंधित लाभार्थ्यांशी संपर्क साधून बँक तपशील व केवायसी अद्ययावत करण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून उर्वरित रक्कम लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी दिली आहे.

# गंगा कदम यांना शासकीय नोकरीची संधी द्यावी– आ. हेमंत पाटील



**हिंगोली, १० डिसेंबर**
नोव्हेंबर महिन्यात झालेल्या अंध महिलांच्या टी–२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय अंध महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार गंगा संभाजीराव कदम यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. देशाचे पंतप्रधान, राष्ट्रपती यांनी या संघाचे कौतुक केले आहे. उपकर्णधार गंगा कदम ही हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील फुटाणा येथील रहीवाशी असून अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून तिने हे यश संपादन केले आहे. त्यांच्या वडीलांचे मे २०२५ मध्ये छत्र हरवले असून आई मोलमजूरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. त्यामुळे गंगा कदम यांना शासकीय नोकरीची संधी तसेच शासनाकडून देय असलेले प्रोत्साहनपर मानधन मिळावे अशी मागणी आ. हेमंत पाटील यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे केली आहे. यावेळी आ. हेमंत पाटील यांनी गंगा कदम यांचा सत्कार केला.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माळेगाव यात्रेत भाविकांना सर्व सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सूक्ष्म नियोजन करा: जिल्हाधिकारी राहुल कर्डिले



तभा वृतसेवा
नांदेड, दि. १० डिसेंबर-

दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या लोहा तालुक्यातील श्री खंडोबा देवस्थान, माळेगाव येथील यात्रा दिनांक १८ ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून यात्रेत सर्व सुविधा उपलब्ध राहतील, यासाठी संबंधित सर्व विभागांनी सुक्ष्म नियोजन करून समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज झालेल्या पूर्व तयारी आढावा बैठकीत ते बोलत होते.

यात्रेच्या पहिल्या दिवशी म्हणजे १८ डिसेंबर रोजी देवस्वारी व पालखी पूजन होईल व दुसऱ्या दिवशी पशुप्रदर्शन व दुग्धस्पर्धा यांचे आयोजन करण्यात येणार आहे. यात्रेच्या कालावधीत भाविकांसाठी आवश्यक सर्व सुविधा प्रशासनाच्यावतीने उपलब्ध करण्यात येणार आहेत. यात्रेच्या सोयीसुविधांबाबत पशुसंवर्धन, कृषी, पोलीस प्रशासन, बीएसएनएल, महावितरण, परिवहन, आरोग्य विभाग आदींच्या कामांचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी दूर दृश्य प्रणालीद्वारे घेतला.

या बैठकीत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, अपर जिल्हाधिकारी रत्नदिप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, पंचायतचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गिरी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, उपआयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रविणकुमार घुले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत , माळेगावचे सरपंच प्रतिनिधी हनुमंत धुळगंडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी आदीची उपस्थिती होती.

**यात्रेत विविध विभागाचे स्टॉल**

यात्रेत भाविकांना शासनाच्या योजनांची माहिती मिळावी म्हणून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना, महाविस्तार प, ग्रीस्टॅक, आयुष्यमान भारत, महिला व बाल विकास विभाग,पशुसंवर्धन विभाग यांचे स्टॉल उभारण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना दिल्या.तसेच भाविकांना इंटरनेट सेवा अखंडित मिळावी यासाठी बीएसएनएलने वायफाय व नेटवर्क व्यवस्थेचे विशेष नियोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या.

**महत्त्वाच्या सुविधा व कामे**

यात्रेच्या काळात पुढीलप्रमाणे सुविधा उभारण्यात येणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी दिली. यात सीसीटीव्ही, वॉशरूम, बॅरिकेट व्यवस्था, मंदिराकडे जाणाऱ्या बायपास रस्त्याची दुरुस्ती, हेलिपॅड, स्वच्छतेसाठी मोबाईल व्हॅन, विविध स्पर्धा व पशुप्रदर्शनासाठी लागणारा निधी याबाबतची माहिती त्यांनी दिली. यावेळी विविध विभागांना यात्रेच्या अनुषंगाने करण्यात आलेले नियोजनाची माहिती यावेळी दिली.

यात्रा परिसरातील कला महोत्सव, मंदिर परिसर, कुस्ती मैदान, कृषी व पशुप्रदर्शन विभाग, बसस्टॅण्ड येथे चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. यासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाची व नियोजनाची माहिती अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी दिली.यात्रेच्या अनुषंगाने लागणाऱ्या सुविधा उपलब्ध होण्या बाबत माहिती माळेगावचे सरपंच श्री. धुळगुंडे यांनी यावेळी केली.

# दहावी-बारावी परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १० डिसेंबर-

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता बारावी व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र दहावी लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणार आहेत.

इयत्ता १२ वी (सर्वसाधारण, व्दिलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांची ऑनलाईन परीक्षा) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा कालावधी मंगळवार १० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार १८ मार्च २०२६ पर्यंत आहे. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच छडटक्र अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा कालावधी शुक्रवार २३ जानेवारी २०२६ ते सोमवार ९ फेब्रुवारी २०२६ हा आहे.

इयत्ता १० वी परीक्षा लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा कालावधी शुक्रवार २० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार १८ मार्च २०२६ राहील. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा (शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा कालावधी सोमवार २ फेब्रुवारी २०२६ ते बुधवार १८ फेब्रुवारी २०२६ हा आहे.

दिनांक निहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## लोहगाव येथील एसबीआय बँकेच्या शाखेचे स्थलांतर थांबवा - काँग्रेस -------

**बिलोली**-तालुक्यातील लोहगाव येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेचे स्थंलातर करण्याच्या हालचालीची चर्चा होत आसुन तरी या भागातील खातेदारांची गैरसोय लक्षात घेऊन वरीष्ठानी स्थलांतरांचा निर्णय मागे



घ्यावा अशी मागणी तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने एका निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे करण्यात आली. बिलोली तालुक्यातील लोहगाव हे गाव जवळपास सात ते आठ हजार लोकवस्तीचे गाव असून या ठिकाणी अनेक छोटी-मोठे व्यवसायिक असून या शाखेस या भागातील जवळपास पंधरा ते विस गावचा समावेश असून अनेक व्यवसायिका बरोबर शेतकरी मोठया संख्येनी या बँकेशी नाळ जोडल्या गेलेली आहे. तरी ही शाखा या भागातील खातेदारासाठी अत्यंत महत्त्वाची असून भविष्यात या शाखेशी जोडल्या गेलेल्या खातेदारांची व जनतेची होणारी गैरसोय लक्षात घेऊन या शाखेचे ईतरत्र स्थलांतर न करता येथेच कायमस्वरूपी आसावी अशी मागणी बिलोली तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने दिनांक ८ डिसेंबर सोमवार रोजी बिलोली तहसीलदार गजानन शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली यावेळी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष प्रा.शिवाजी पाटील पाचपिपळीकर, दिलीप पांढरे,राजु पा. शिंपाळकर,पांडुरंग पा.रामपुरे, तिरुपती पा. हिवराळे, माधव पा. नरवाडे, हाणमंत नरवाडे, नरसिंग मोंडेवाड, सयाराम निदाने, प्रल्हाद वानोळे, आनिल तोटावाड, सुर्यकांत नरवाडे,यां्च्यासह अनेकांच्या सहयाचे निवेदन देण्यात आले.

## नवोदय परीक्षेसाठी इतर तालुक्यातील पर्यवेक्षक नेमण्याची मागणी

**हिमायतनगर**- तालुक्यातील होत असलेल्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेसाठी पर्यवेक्षकांची नियुक्ती ही तालुका बदलून करावी अशी मागणी स्थानिक पालकांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे दि.८ डिसेंबर रोजी एका निवेदनाद्वारे केली आहे. पालकांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, गेल्या काही वर्षांपासून ग्रामीण भागातील गरीब व मेहनती विद्यार्थ्यांना नवोदय सारख्या दर्जेदार संस्थांमध्ये प्रवेश मिळावा, यासाठी पालक सह विद्यार्थी मोठ्या अपेक्षेने प्रयत्न करीत आहेत. मात्र, परीक्षेदरम्यान काही ठिकाणी कॉपीचा प्रकार घडत असल्याची तक्रार पालकांनी केली. त्यामुळे प्रामाणिकपणे परीक्षा देणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांवर अन्याय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परीक्षेवर पूर्ण नियंत्रण असावे, परीक्षा केंद्रांवर कोणत्याही गैरप्रकार होऊ नये, यासाठी संबंधित परीक्षेच्या दिवशी नेमलेले पर्यवेक्षक हे संबंधित त्याच तालुक्यातील नसावेत. अशा प्रकारे पर्यवेक्षकांची तालुका बदली करूनच परीक्षा पार पाडावी, अशी ठाम मागणी पालकांनी निवेदनातून केली आहे. या निवेदनाच्या प्रिती जि.प मुख्यकार्यकारी अधिकारी , शिक्षणाधिकारी, गटविकास अधिकारी यांना देऊन योग्य ती कारवाई करण्याची विनंती केली आहे. यावेळी संजय मुनेश्वर, संतोष पुठ्ठेवाड,निळू पवार, गजानन निरटवाड,दत्ता प्रपुलवाड,माने,यासह अनेक पालक उपस्थित होते.

## स्वारातीम विद्यापीठ अंतर्गत हिवाळी सत्राच्या पदवीत्तर परीक्षा १२ डिसेंबर

**नवीन नांदेड**- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत घेण्यात येणे येणाऱ्या हिवाळी सत्रातील पदव्युत्तर परीक्षा २०२५ ह्या दिनांक १२ डिसेंबर पासून चार जिल्ह्यातील ५१ परीक्षा केंद्रावरून घेण्यात येणार आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत चार जिल्ह्यातील ५१ परीक्षा केंद्रावरून ३३ हजार विद्यार्थी परीक्षा देणारा असून यामध्ये एम कॉम, एम एससी, बी एड, बीसीए, लॉ या वर्गाच्या परीक्षा दिनांक १२ डिसेंबर २०२५ पासून सुरुवात होणार आहे . सदरील परीक्षा सीसीटीव्हीच्या निगरानित होणार आहेत. यापूर्वीही मोजक्याच कोर्सच्या परीक्षा सीसीटीव्हीच्या निरानित घेल्या जात होत्या आता संपूर्ण महाविद्यालयात सीसीटीव्ही कॅमेऱ्याची सोय उपलब्ध असल्याने १२ डिसेंबर २०२५ पासून सुरू होणाऱ्या पदव्युत्तर परीक्षाही सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगरानित होणार आसुन यामध्ये चार जिल्ह्यातील ५१ केंद्रावरून ३३ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा देणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशार सिंग साबळे यांनी दिली.

## जाहिर प्रगटन

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की,अर्जदार गंगाधर चांदबा जाधव रा.भोकर यांनी मौ.भोकर येथील गट क्र.३८६/४१मधील क्षेत्र १.६० हे.आर.या जमीनीचे भोगवटदार वर्ग २ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमीनी भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतरीत करणेचा अर्ज या कार्यालयास सादर केला आहे.त्या अनूषंगाने मौ.भोकर येथील गट क्र.३८६/४१ मधील क्षेत्र १.६०हे.आर.या जमीनीचे भोगवटदार वर्ग २ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमीनी भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतरीत करणे संदर्भात ज्या व्यक्तीस हितसंबध व्यक्तीस आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास तर ती त्यांनी १५दिवसाच्या आत लेखी स्वरुपात आवश्यक त्या दस्तऐवजासह दाखल करावा.विहीत मूदतीत प्राप्त होणारे आक्षेप/हरकती किंवा मोघम स्वरुपात सादर केलेल्या आक्षेप/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

तहसीलदार भोकर.

# अवैध उत्खनन करणाऱ्यावर कारवाईची आ. बाबुराव कोहळीकरांची मागणी

तभा वृतसेवा
हदगाव, दि. १० डिसेंबर-

तालुक्यातील वारकवाडी, वानवाडी व मांडवा परिसरात बौद्ध धर्माचे पवित्र तीर्थक्षेत्र तसेच जागतिक दर्जाचे उर्गन संघरक्षित ध्यान भावना केंद्र स्थित आहे. या आध्यात्मिक व सांस्कृतिक महत्त्वाचा स्थळालगत असलेल्या डोंगरांमध्ये एका खाजगी कंपनीच्या ठेकेदारा मार्फत अवैधरित्या महसुली अधिकाऱ्यांना हाताशी धरून दिवसें- रात्र उत्खनन चालू असून परवानगी पेक्षा अधिक प्रमाणात मुरूम उत्खनन करण्यात येत असून यांच्यावर कायदेशीर कारवाईची मागणी आ. कोहळीकर यांनी नागपूर येथे चालू असलेल्या हिवाळी अधिवेशनात केली. यामुळे महसूल प्रशासनाचे पितळ मात्र उघडे पडले आहेत.

विकासाच्या नावाखाली हदगाव तालुक्यातील नैसर्गिक डोंगर उध्वस्त करण्यासाठी कंत्राटदारांची भूमाफिया संघ तयार झाले असून महसूल प्रशासनाच्या काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून डोंगर पोखरण्याचे काम कंत्राटदारांकडून हे भूमाफिया



यांच्यामार्फत दिवसान रात्र चालू आहेत. आ. कोहळीकर पुढे म्हणाले की, या गंभीर विषयांवरती स्थानिक नागरिकांनी महसूल विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून कारवाईसाठी टाळाटाळ करण्यात येत असल्याचा आरोप होत आहे. या सर्व गंभीर परिस्थितीची दखल घेत आ.कोहळीकर यांनी या मुद्द्याकडे शासनाचे लक्ष वेधत अवैध उत्खननाची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदार व त्यांना सहकार्य करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. बौद्ध धम्माचे जागतिक तीर्थस्थळ असलेल्या क्षेत्राचे संरक्षण व्हावे तसेच पर्यावरणीय हानी रोखण्यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून उपाययोजना कराव्यात अशी ही मागणी केली.

# बिबट्यांचा बंदोबस्त करा : आ. जितेश अंतापूरकर

तभा वृतसेवा
देगलूर, दि. १० डिसेंबर-

देगलूरबिलोली मतदारसंघासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामीण भागातील शेतकरी, नागरिक अक्षरशः दहशतीत दिवस काढत आहेत. याच पार्श्वभूमीवर आ. जितेश अंतापूरकर यांनी हिवाळी अधिवेशनात 'पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन'द्वारे हा गंभीर मुद्दा उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले.

गेल्या काही आठवड्यांपासून बिबट्या तसेच अन्य हिंस्र वन्यप्राण्यांचे दर्शन नागरी वस्त्यांमध्ये होत असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. काही ठिकाणी दिवसा शेतावर जाणेसुद्धा शेतकऱ्यांना धोकादायक ठरत आहे. त्यात भर म्हणून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या ढिसाळ नियोजनामुळे दिवसा लोडशेडिंग तर रात्री वीजपुरवठा सुरू असल्यानं, पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना मध्यरात्री शेतावर जावे





लागत आहे. बिबट्या आणि वाघांच्या हालचाली वाढलेल्या काळात हा प्रवास 'जीवावर उदार होऊन' करावा लागत असल्याचे आ. अंतापूरकर यांनी स्पष्ट केले.

वनविभागाच्या निष्क्रीयतेमुळे बिबट्या, वाघ यांसारखे वन्यजीव सर्रास वस्तीमध्ये फिरताना दिसत असून राज्यभरात अशा घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. काही ठिकाणी पाळीव जनावरेच नव्हे तर लहान मुले आणि वयोवृद्ध नागरिकही या हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्याचे बळी पडल्याच्या घटना वाढत असल्याचा त्यांनी उल्लेख केला.

या सर्व परिस्थितीची तत्काळ दखल घेऊन वनविभागाला संबंधित बिबट्यांना पकडण्याचे आदेश देण्यात यावेत, तसेच दिवसाची लोडशेडिंग तातडीने थांबवावी, अशी कडवी मागणी अंतापूरकर यांनी सभागृहात केली. नागरिक आणि शेतकरी सुरक्षित राहण्यासाठी शासनाने त्वरित उपाययोजना करणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

**महावितरण विभाग व वनविभागाचे अक्षम्य दुर्लक्ष..**

एकीकडे बिबट्यांचा नागरीक वस्तीत वावर मोठ्या प्रमाणात होत असताना संबधित वनविभागाचे अधिकारी अक्षम्य दुर्लक्ष करीत सुस्त असून परिणामी नागरीक भयभीत आहेत. दूसरीकडे महावितरण विभागाच्या अक्षम्य दुर्लक्ष व असंवेदनशीलतेमुळे परिणामी रब्बी हंगामात बळीराजाला रात्रीला शेतात पाणी द्यावे लागत असून बळीराजा जिवावर उदार होत आहे यामुळे वनविभाग बिबट्यांचा बंदोबदस्त व महावितरण कंपनीने दिवसा विज वितरण सुरळीत चालू ठेवण्याची सुचना सभागृहाच्या माध्यमातून सुचना केल्या आहेत.

# नरसी अपंग निवासी विद्यालयात उत्साहात साजरा

तभा वृतसेवा
नायगाव , दि. १० डिसेंबर-

नरसी येथील श्री संगमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अपंग निवासी विद्यालयात जागतिक दिव्यांग दिन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका सौ. आनुसया हिमगीरे यांच्या हस्ते डॉ. हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर शिक्षक व कर्मचार्यांनीही सामूहिकरित्या अभिवादन करत दिव्यांग दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. यशाळेतील विद्यार्थ्यांच्या कला व गुणांना संधी मिळावी या उद्देशाने रांगोळी व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवे चैतन्य व आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी पी.जी. तमशेट्टे, सौ. पी.एम. वाघमारे, सौ. एस.जी. तमशेट्टे, एम.आर. बागवान, एस.जी. भालके, सौ. ए.एल. गवलवाड तसेच शिक्षकवृंद हि.एन. शिंदे, एस.एम. कुहाडे, ए.आर. बेग, एन.एस. मांजरमकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

# दुभाजकावर चढलेल्या पोलीस वाहनाची रस्त्याच्या मधोमध नेहमीच 'पार्किंग'

तभा वृतसेवा
नांदेड, दि. ९ डिसेंबर-

मंगळवारी सायंकाळी शहरातील श्रीनगर मार्गावर एक पोलीस वाहन रस्त्याच्या अर्धवट कामामुळे दुभाजकावर चढले होते. या अपघातानंतर रस्त्याच्या कामाविषयी मोठ्या प्रमाणात चर्चा झाली परंतु अपघातग्रस्त झालेले हे पोलीस वाहन यापूर्वीही अनेक वेळा शहरातील अनेक मार्गावर सुसाट कट मारत धावत असल्याचे अनेकांनी पाहिले आहे. त्यातच रस्त्याच्या मधोमध पार्किंग करण्यात या वाहनाचे वाहन चालक पटाईत असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

अपघातग्रस्त या पोलीस वाहनाचा फोटो समाज माध्यमावर व्हायरल झाल्यानंतर हे पोलीस वाहन रस्त्याच्या मधोमध पार्किंग केले असल्याचे



यापूर्वीचे देखील फोटो वायरल झाले आहेत. या वाहनांमध्ये नेहमी एक महिला पोलीस अधिकारी असते आणि चालक देखील महिला पोलीस कर्मचारी आहे. अनेकवेळा हे वाहन शहरातील अनेक मार्गावरुन सुसाट आणि कट मारत धावत असल्याचे अनेकांच्या निदर्शनास आले आहे. मागील जवळपास पंधरा दिवसांपूर्वी चौफाळा रोड बिलाल नगर येथे रात्री साडे आठच्या सुमारास हे पोलीस रस्त्याच्या मधोमध पार्कींग करण्यात आले होते. रस्त्याच्या मधोमध वाहन लावल्याबद्दल महिला वाहन चालकाला एका पत्रकाराने देखील हटकले होते. योवळी पोलीस वाहन असल्याचा रुबाब महिला चालकाने दाखवला परंतु अपघात झाल्यास जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित करतात त्या महिला चालकाने वाहन रस्त्याच्या बाजूला घेतले. या घटनेचे अनेकजण प्रत्यक्षदर्शी असल्याचेही चर्चा आहे.त्यातच मागील काही दिवसापासून हे वाहन शहरातील विविध मार्गावर अनेक वाहनांना कट मारत धावत असल्याचेही अनेकांनी सांगितले.

# अखेर तो उपद्रवी वानर जेरबंद! माहूर,पुसदच्या रेस्क्यू टीमची संयुक्त कारवाई

तभा वृतसेवा
माहूर , दि. १० डिसेंबर-

दैनिक तरुण भारत मध्ये दि. १० डिसेंबर रोजी 'वानरांचा बंदोबस्त करण्याची मागणी' या मथळ्याखाली बातमी प्रकाशित होताच या बातमीची तातडीने दखल घेत माहूर वनपरिक्षेत्र कार्यालयाचे वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांनी २४ तासाच्या आत उपवन संरक्षक केशव वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुसद आणि माहूरच्या कर्मचाऱ्यांची रेस्क्यू टीम तयार करून स्वतः हजर राहत सदरील उपद्रवी वानरास आज बुधवार दि.१० डिसेंबर रोजी जेरबंद केले... आणि या वानराच्या भीतीमुळे धास्तावलेल्या ग्रामस्थांनी अखेर सुटकेचा निःश्वास सोडला.

माहूर तालुक्यातील टाकळी येथे एका वानराने अनेक दिवसांपासून येथील नागरिकांना हल्ले करून नुकसान करणे सह इतर



प्रकारे उपद्रव माजवून सळो की पळो करून सोडले होते त्यामुळे येथील सरपंच आणि ग्रामसेवकांनी निवेदन देऊन सदरील वानराचा बंदोबस्त करण्याची मागणी केली होती. त्यामुळे वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांनी २४ तासाच्या आत उपवन संरक्षक केशव वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुसद आणि माहूरच्या कर्मचाऱ्यांची रेस्क्यू टीम तयार करून स्वतः हजर राहत सदरील उपद्रवी वानरास आज बुधवार दि.१० डिसेंबर रोजी अखेर जेरबंद केले.

उपवनसंरक्षक नांदेड केशव वाबळे, सहाय्यक वनसंरक्षक किनवट किरण चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच रोहित जाधव वनपरिक्षेत्र अधिकारी माहूर यांच्या आदेशान्वये वनपरिक्षेत्र कार्यालय माहूर अंतर्गत वनपरिमंडळ माहूर नियतक्षेत्र वझरा मधील मौजे टाकळी या गावात मागील काही दिवसांपासून एक नर वानर गावातील लोकांवर हल्ला करून पळून जात असे. अखेर आज बुधवारी या वानराला पुसद येथील आर आर यु टीम च्या मदतीने पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या निगराणीत रेस्क्यू करण्यात आले व त्याला निसर्ग अधिवासात सोडण्यात आले.

यावेळी वनपाल माहूर मनोहर कत्तुलवार, वनरक्षक दिपक माने, महेश मांजलवाड, आर आर यु टीम चे प्रमुख शे. मुखबीर ,वनरक्षक रवी राठोड, किरण सातपुते, मानद वन्यजीव रक्षक पशुसेवक रवी मोरे, वनसेवक कैलास जाधव व परमेश्वर नाईक यांचे सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनाची दखल घेऊन तात्काळ कारवाही करून वानरास जेरबंद केल्याप्रकरणी माहूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांचे अभिनंदनासह आभार व्यक्त केले जात आहे.

## बनावट वेबसाईटस, मोबाईल ॲप्स पासून सतर्क राहण्याचे आवाहन

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १० डिसेंबर-

वाहनधारक आणि चालकांची आर्थिक फसवणूक वाढल्याच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने बनावट वेबसाइट्स, संशयास्पद मोबाईल प्स (एपीके) आणि खोट्या ई चालान लिंकपासून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई-चालान यांसारख्या सेवांच्या नावाखाली अनेक नागरिकांची वैयक्तिक माहिती व आर्थिक व्यवहारांची फसवणूक होत असल्याचे परिवहन विभागाच्या निदर्शनास आले आहे. फसवणूक करणारे मोबाईल एसएमएस किंवा व्हॉट्सप संदेशांद्वारे चलन बाकी आहे, परवाना सस्पेंड होणार आहे अशा धमकीपर संदेशांसह अनधिकृत पेमेंट लिंक पाठवून पैसे उकळण्याचा प्रयत्न करत आहेत. परिवहन विभागाने याबाबत स्पष्ट सांगितले की, आरटीओ कार्यालय किंवा परिवहन विभाग नागरिकांना कधीही व्हॉट्सॲप वरून पेमेंट लिंक पाठवत नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तसेच RTO Services.apk, mParivahanšUpdate.apk, eChallan Pay.apk अशी अज्ञात एपीके फाईल्स डाऊनलोड केल्यास मोबाईलमधील ओटीपी, बँकिंग माहिती आणि इतर संवेदनशील माहिती चोरी होण्याचा धोका आहे.

नागरिकांनी तक्छ (वाहन नोंदणी सेवा) https://vahan.parivahan.gov.in, SR-THI (ड्रायव्हिंग लायसन्स सेवा) https://sarathi.parivahan.gov.in, परिवहन सेवा पोर्टल https://www.parivahan.gov.in तसेच ई-चालान पोर्टल https://echallan.parivahan.gov.in `m gov.in डोमेनच्या अधिकृत सरकारी संकेतस्थळांचाच वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे .com, .online, .site, .in किंवा इतर कोणत्याही डोमेन वरील वेबसाइटवर वाहनधारकांनी माहिती नोंदवू नये.

असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत कंकरेज यांनी केले आहे.